



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक ३६ * नांदेड * शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# निवडणुकीत लाडक्या बहिणींनी सावत्र भावांना धडा शिकवला -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## आभार यात्रेच्या निमित्ताने शिवसेनेचे जोरदार शक्तीप्रदर्शन





**नांदेड (प्रतिनिधी)-** विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी आणि उबाठा महाविकास आघाडीला जोरात वाजवत (जोडा मारत) महायुतीला दैदिप्यमान यश मिळवून दिले. या निवडणुकीत लाडक्या बहिणींना सावत्र भावांना अर्थात विरोधकांना चांगलाच धडा शिकवत महायुतीला भरभरून यश दिले. त्या यशाची उतराई म्हणून मी आपला आभार मानण्यासाठी आलोय असे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मराठवाड्याच्या तसेच नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे. आपल्या आमदारांनी कुठेही जनतेची सेवा करण्यासाठी कमी पडू नये मी ताकतीने आपल्या सोबत उभा आहे. असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

निवडणुका झाल्यानंतर विजयी उमेदवार किंवा कुठलाही पक्ष मतदारांचे आभार मानण्यासाठी कधीच येत नाही, परंतु मी आपल्यापुढे नतमस्तक होण्यासाठी आलोय. आपले असेच प्रेम यापुढेही माझ्यासोबत राहतील असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. आभार यात्रेच्या जाहीर सभेत गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी नवीन मोंढा मार्केट कमिटी मैदानावर ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री दर्जा असलेले आमदार हेमंत पाटील, माजी मंत्री जयप्रकाश मुंदडा, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव कोहळीकर, माजी खा. सुभाषराव वानखेडे, गोदावरी अर्बनच्या अध्यक्षा राजश्री पाटील, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, विनय गिरडे पाटील, गंगाधर बडूरे, विनोद देशमुख, संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार महिला आघाडीच्या वनमाला राठोड, गीता पुरोहित, दीपा पाटील यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, नांदेड सत्याची भूमी असून या भूमीत मागच्या निवडणुकीत सत्याचा विजय झाला. नऊच्या नऊ जागा महायुतीला तुम्ही निवडून दिल्या. लाडक्या भावाला खऱ्या अर्थाने लाडक्या बहिणींनी आशीर्वाद दिला. तुमच्या योजनांमध्ये खोडा घालणाऱ्यांना तुम्ही निवडणुकीत जोडा दाखवला नव्हे तर जोरात वाजवत त्यांना भुईसपाट केले. आणि दैदिप्यमान विजय मिळवून महायुतीच्या हातात सत्ता दिली. याबद्दल आपले कौतुक करावे तितके कमी. निवडून आलेल्या आमदारांनी आपल्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कामे करून लोकांची सेवा करावी. लाडक्या बहिणींनो तुमच्यासाठी सुरू केलेली योजना मी बंद पडू देणार नाही. वसमत येथील हळद संशोधन केंद्राच्या कामाला पूर्णत्वास नेण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नांदेड शहर आणि जिल्ह्यात आमदारांच्या माध्यमातून हजारो कोटींचा निधी देऊन विकास कामे केली जात आहेत. आमची घेना बँक नाही तर देना बँक आहे. मी सर्वसामान्य कुटुंबातून आल्याने मला गोरगरिबांची जाण आहे. हा पक्ष माझा एकट्याचा नाही तर कार्यकर्त्यांचा पक्ष आहे आणि कार्यकर्ता हा घरी नसून जनतेच्या दारात शोभा दिसतो, असे बाळासाहेब ठाकरे म्हणायचे त्यानुसार आम्ही काम करत आहोत.

नांदेड आणि मराठवाड्याच्या विकासासाठी तुम्ही चार जण चौकार मारा मी तुमच्यासोबत आहे. या ठिकाणी कामात मेरिट चालतं. शिवसेनेत वशिला चालत नाही आणि पैसा तर मुळीच लागत नाही. पण काही लोकांनी उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता स्वतः साठी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधली. शिवसैनिकांचे खच्चीकरण होत असल्याने मला बंडखोरी करावी लागली आणि तुमच्या सर्वांच्या ताकतीने मी बाळासाहेबांचे खऱ्या अर्थाने विचार पुढे नेण्याचा काम करत आहे.

**(पान ३ वर...)**

## समृद्धी महामार्ग प्रमाणे शक्तिपीठ मार्गाचाही विरोध मावळेल -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**नांदेड (प्रतिनिधी)-** महामार्ग हे विकासाचे 'गेमचेंजर' म्हणून सिद्ध होतात. समृद्धी महामार्गाने हे सिद्ध केले आहे. सुरुवातीला समृद्धी महामार्गाला विरोध होता. समृद्धी सारखाच या शक्तीपीठ महामार्गाचा विरोध देखील हळूहळू मावळेल, असा आशावाद उपमुख्यमंत्री तथा राज्याचे नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

एकनाथ शिंदे एक दिवसाच्या नांदेड दौऱ्यावर आले होते. दिवसभरात त्यांचे विविध कार्यक्रम होते. दुपारी गुरुगोविंद सिंघजी नांदेड विमानतळावर आगमनानंतर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी नांदेड येथील पवित्र श्री हुजूर साहिब सचखंड गुरूद्वारा येथे भेट देऊन दर्शन घेतले. दुपारी त्यांनी जाहीर सभेला संबोधित केले. सायंकाळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी शक्तिपीठ महामार्गाचा विरोध ओसरेल असे स्पष्ट केले. ते म्हणाले समृद्धी किंवा शक्तिपीठ सारखे महामार्ग केवळ दळणवळणाची व्यवस्था नाही तर या भागातील कृषीवर आधारित अर्थव्यवस्थेला गती देणारे नवीन मॉडेल आहे.

**(पान ३ वर...)**

## शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्याचा पाण्यात बुडून मृत्यू



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)-** कालव्यातील पाण्याचा अंदाज न आल्याने वाहून एका १४ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. सदर बालकाचा मृतदेह दि. ६ फेब्रुवारी रोजी देगाव शिवारात सापडला.

शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहात राहणारा बळेगाव येथील जनता हायस्कूल येथे आठवी वर्गातील रितेश मारोती सूर्यवंशी (१४) हा विद्यार्थी मित्रांसोबत पोहण्यासाठी मानारच्या कालव्यात गेला. येथे त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने त्याचा मृत्यू झाला.

घटना कळताच बिलोलीचे उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, नायगावच्या तहसीलदार धम्म प्रिया गायकवाड, समाजकल्याण अधिकारी पोलीस प्रशासन आणि महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. दि.६ फेब्रुवारी रोजी मानार प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून कॅनालचे पाणी बंद केल्याने देगाव शिवारात रितेश मारोती सुर्यवंशी यांचा मृतदेह सापडला. रितेशच्या अचानक झालेल्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## वाळू वाहतूक करणाऱ्या हायवाने जांब येथील मोटारसायकलस्वारास चिरडले



**जांब (प्रतिनिधी)-** मुखेड-जांब राज्य मार्गावरील लादगा फाट्याजवळ वाळू वाहतूक करणाऱ्या वेगवान हायवाने जांब येथील मोटारसायकलस्वारास चिरडल्याने युवकाचा चेंदामेंदा होऊन जागेवरच मृत्यू झाल्याची घटना बुधवारी संध्याकाळी ९.२० वाजताच्या दरम्यान घडली.


जांब येथील युवक माधव शिवाजी बिजले (३५) हा मोटारसायकल क्रमांक एमएच-२६ बीडब्लू ३३५१ वरून जांबकडून सावरगाव (पी) येथे जात असताना लादगा फाट्याजवळ वाळूने भरलेला हायवा क्रमांक एमएच ४ एचवाय ७०८६ हा मुखेडकडून उदगीरकडे जात असताना दुचाकीस्वारास चिरडले असून, मयताचा व मयताच्या मोटारसायकलचा चेंदामेंदा झाला आहे. यात माधव बिजले यांचा जागेवरच चिरडून मृत्यू झाला आहे.

या घटनेची माहिती मिळताच पो. नि. लक्ष्मणराव केंद्रे, स.पो.उप. पंडित राठोड, गणेश वनामे, किरणकुमार वाघमारे यांनी घटनास्थळी भेट देऊन मयताचे शवविच्छेदन करण्यासाठी मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सकाळी शवविच्छेदन करण्यात आले. मयत माधव बिजले यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, असा परिवार आहे.

## भारताचा इंग्लंडवर सहज विजय

**नागपूर (प्रतिनिधी)-** शुबमन गिलची ८७ धावांची खेळी, श्रेयस अय्यरची वादळी आणि महत्त्वपूर्ण फटकेबाजी, संकट मोचक अक्षर पटेलचं अर्धशतक अन् भारताच्या गोलंदाजांची भेदक गोलंदाजी यासह भारतीय संघाने इंग्लंड संघावर पहिल्या वनडेत सहज विजय मिळवला आहे.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# जम्मू-काश्मीरमधील विकासाला पाकिस्तानच्या विघातक धोरणांचे आव्हान

पाकिस्तानी आणि काश्मिरी दहशतवाद्यांना मुक्त संचार देणारे कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू-काश्मीरने विकासाची नवीन उंची गाठण्यास सुरुवात केली आहे. विशेष राज्याचा दर्जा संपुष्टात आल्यानंतर, या भागाने केवळ शांतता अनुभवली नाही, तर विकासाची पायाभूत कामेही मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहेत. राज्यात नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत जनतेचा मोठा सहभाग दिसून आला आणि त्यातून लोकशाहीची मूल्ये अधिक मजबूत झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन करत, जम्मू-काश्मीरच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कटिबद्ध असल्याचे दाखवले आहे. त्यांनी पुलवामा जिल्ह्यातील मधुमक्षिकापालनात उल्लेखनीय यश मिळवलेल्या नझीम या तरुणाचे कौतुक केले. त्याचबरोबर जम्मू-काश्मीरमध्ये बारामुल्ला-उधमपूर रेल्वेलाईन व पहिल्या इलेक्ट्रिक रेल्वेगाडीचा प्रारंभ, तसेच गंदरबल जिल्ह्यातील झेड-मोढ बोगद्याच्या उद्घाटनाने या भागातील पायाभूत सुविधांची प्रगती अधोरेखित केली. काश्मीरच्या प्रगतीने पाकिस्तानला मात्र अस्वस्थ केले आहे. तेथील शांतता आणि विकास पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना धक्का पोहोचवतो. भारतीय लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी स्पष्टपणे सांगितले की, जम्मू-काश्मीरमधील ८० टक्के दहशतवादी हल्ल्यांसाठी पाकिस्तान जबाबदार आहे. नियंत्रण रेषेवरील युद्धविरामानंतरही पाककडून घुसखोरीचे प्रयत्न थांबलेले नाहीत. भारताने आतापर्यंत अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला असून, या लढाईत भारतीय लष्कराची ताकद पुन्हा पुन्हा सिद्ध झाली आहे. समाजाची एकत्रित ताकद आणि लष्कराची अनुशासित क्षमता पाहता, काश्मीरमध्ये विकास व शांतता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य आहे. जम्मू-काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा परत मिळण्याची अपेक्षा स्थानिक नेत्यांकडून व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी ही अपेक्षा मांडली असून, अशा पावलांमुळे केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील. जनतेला शांतता, विकास, आणि स्वातंत्र्याची जाणीव असावी हीच अपेक्षा आहे. पाकव्याप्त काश्मीर (पीओके) संदर्भात भारताने नेहमीच स्पष्ट भूमिका मांडली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी जम्मूतील भाषणात पुन्हा यावर भर दिला, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पीओके हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे ठामपणे सांगितले. १९९४ साली भारतीय संसदेत एकमताने मंजूर झालेल्या ठरावानेही याला दुजोरा दिला आहे. मात्र, पीओकेमध्ये आजही विकासाऐवजी दहशतवादाला खतपाणी घालणारे धोरण अवलंबले जात आहे. जम्मू-काश्मीरमध्ये उद्योगाभिमुख विकासाला प्रोत्साहन दिले जात आहे. येथे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असून, या प्रकल्पांमुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. तसेच अमरनाथ यात्रा आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांत वाढलेल्या सहभागाने शांततेचा संदेश दिला आहे. पाकिस्तानने आपला दहशतवादी कारभार थांबवला नाही तर भारतीय लष्कर आणि जनता या दोघांचाही धीर सुटण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, पीओकेवर भारतीय तिरंगा फडकण्याचा दिवस दूर नाही, असे वाटते. कारण शांतता, सुरक्षा, आणि विकासासाठी भारताचा दृढ निर्धार अधिक बळकट होत चालला आहे. काश्मीर हा भारताचा मुकुटमणी आहे आणि त्याच्या विकासासाठी सरकार व लष्कर पूर्णपणे कटिबद्ध आहे. पाकिस्तानकडून येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला जशास तसे उत्तर देत, काश्मीरला प्रगतीच्या शिखरावर नेणे हाच उद्देश आहे. राजकीय संवाद, प्रगतिशील धोरणे आणि लोकांचा सहभाग या माध्यमातून काश्मीरचे भविष्य उज्ज्वल होईल, यात शंका नाही. काश्मीरच्या जनतेने विकासाचा मार्ग निवडलेला आहे, मात्र पाकिस्तानला ही शांतता सहन होत नाही. त्यामुळे भारताला सतत सावध राहावे लागेल. परंतु भारतीय समाज व लष्कराच्या एकत्रित प्रयत्नांमुळे जम्मू-काश्मीरची कहाणी एक प्रेरणादायी उदाहरण ठरेल, यात शंका नाही.

# मानवतेची आई - रमाई



रमाई भिमराव आंबेडकर हे फक्त नाव नाही माणवता, संघर्ष, संसाराची तडजोड, समजदार पणा व कर्तव्यांची जाणीव असलेली वैचारिक खान म्हणजे रमाई. शिक्षणाने अडाणी आणि पैशाने गरिब असलेल्या या मानवतावादी आईने सर्वोत्तम विद्वान असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आणि आजही समाजाला खुप काही शिकवले आहे. रमाईचा संघर्ष, संकटातून सावरण्याचे माणसिक सामर्थ्य हे सर्व सामान्य महिलेला जमने शक्यच नसताना रमाई ने त्याचा अनुभव पावलो पावली घेतला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची पत्नी म्हणून रमाईला तर महत्व आहेच परंतु रमाईचा त्याग आणि कतृत्व बघितले तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून माणसिक बळ देण्याचे महत्वपूर्ण रमाई ने केले म्हणून रमाई अजून जास्त वंदनीय आहेत. रमाई समजून घेताना प्रत्येकांचे डोळे पानावले जातात कारण जन्मापासून तर मृत्यूपर्यंत रमाईने केला तो फक्त संघर्ष आणि त्याग. आणि हा संघर्ष आणि त्याग स्वहीत साधण्यासाठी, स्वतः साठी बंगले बांधुन महागड्या गाडी मध्ये मेकअप करून फिरण्यासाठी तर मुळीच नव्हता. आज आपण समाजामध्ये बघतो तर दोन पैसे कमवणारा माणूस असला तर बायको वेगळ्याच तोऱ्यात राहते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तर सर्वश्रेष्ठ विद्वान होते रमाईने तर किती तोऱ्यात रहायला पाहिजे होतं परंतु रमाई ने आपल्या पुर्ण इच्छा मारून समाजाच्या उत्थानासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. समाजासाठी रमाईचा त्याग काय आहे याची कल्पना देखील करू शकत नाही. कारण स्वतः चे तिन मुलं एक मुलगी रमाईने गमावली. लहानपणापासून आई वडील भावंडे यांचे मृत्यू बघुन रमाई चे मन मेलेच होते परंतु लग्नानंतर पोटचे मुलं, वडीलांसारखे माया लावणारे सासरे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भाऊ आनंदराज यांचा मृत्यू देखील रमाई ने पाहीला. बाबासाहेब परदेशात शिक्षण घेत आहेत त्यांना शिक्षणात कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊ नये म्हणून रमाईचा मुलगा वारतो रमाई स्वतः त्याचा अत्यंविधी करतात, दुखाचे अश्रू पिऊन स्वत:लाच समजवतात परंतु बाबासाहेब आंबेडकर यांना याची कल्पनाही देत नाहीत. केवढे मन असेल या आईचे. आपण मुलाला साधा ताप आला तर सर्व कामे सोडून अगोदर मुलाच्या दवाखान्याच बघतो. परंतु रमाईने मुल गेले तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना व्यत्यय आणला नाही म्हणून आज रमाईच्या संघर्षामुळे करोडो मुलं सुरक्षित आहेत हा त्याग रमाईचा आहे आणि याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. लग्नानंतर गौऱ्या थापुन त्या विकुन, एकाच लुगड्यावर राहून मिळालेला पैसा डॉक्टर बाबासाहेब यांना शिक्षणासाठी कामी येईल म्हणून पै पै जमा करून बाबासाहेब आंबेडकर यांना हातभार लावणारी रमाई खऱ्या अर्थाने संसाराची जाणीव असणारी सर्व श्रेष्ठ स्त्रि ठरली.

लग्नानंतर सुरवातीच्या काळात रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची परिस्थिती हलाखीची होती परंतु नंतरच्या काळात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे प्राध्यापक म्हणून रूजू झाले आणि दरमहा साडेचारशे रुपये पगार घरात येऊ लागला. थोडा विचार करा शंभर वर्षा अगोदर साडेचारशे रुपये पगार, जगातील विद्वान माणसाच्या बायकोने कसे रहायला पाहिजे. परंतु आलेला पगार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांनी स्वतः च्या संसारावर खर्च न करता तोच पैसा समाजावर खर्च केला. आणि पुन्हा आपल्य ईच्छा मारल्या. आणि समाजाला जगवण्यासाठी सामाजिक उपाययोजना करण्यासाठी रमाई ने बाबासाहेब आंबेडकर यांना साथ सहयोग केला. पुढे बाबासाहेब मुंबई प्रांताचे आमदार सुद्धां झाले. विचार करा डॉ बाबासाहेब आंबेडकर हे शंभर वर्षाअगोदर आमदार होते, ख्यातनाम वकील व बुद्धीवान प्राध्यापक होते. आता तर त्यांना वैयक्तिक काही अडचण नव्हती. वैयक्तिक संसार करायचा तर अगदी थाटामाटात केला असता परंतु रमाईने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आमदार झाले तरीही कोणत्याही मोहात पडल्या नाही अथवा बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजावरून लक्ष विचलित होईल असे काहीही केले नाही. नाही संसार करताना कोणत्याही गोष्टीचा हट्ट केला नाही, ना दागिने ना कपडे याचा मोह केला नाही. केला तो फक्त नवऱ्यावर विश्वास. दिली ती नवऱ्याला साथ. म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे समाजासाठी खुप काही करू शकले. रमाईच्या मनात थोडा जरी पैशाचा गर्व, पदाचा अंहकार आला असता तर कदाचित डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक चळवळीमध्ये कमी पडले असते. परंतु रमाईच्या संघर्ष व त्यागापुढे डॉ. बाबासाहेब हे सुद्धां नतमस्तक झाले होते. कारण बाबासाहेब आंबेडकर यांचे कोणतेही काम रमाईच्या संघर्षाशिवाय पुर्णच होऊ शकले नसते. एका आमदाराची बायको म्हणून नव्हे तर दबलेल्या, दुर्लक्षित असलेला घटक म्हणून रमाई जगली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना नोकरी लागल्या नंतर रमाई व बाबासाहेब यांना वैयक्तिक कोणत्याही प्रकारची अडचण नसताना रमाई ने समाजासाठी संपूर्ण आयुष्य अडचणी मध्ये काढणे म्हणजे केवढा त्याग आणि समर्पण म्हणावे लागेल.

रमाईच्या त्याग संघर्ष आणि समर्पणातुन बरेच काही शिकण्यासारखे आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रि चा हात असतो याचे जागतिक उदाहरण म्हणजे फक्त रमाई आहे. आर्थिक आवक येत असताना ही अर्थला अर्थ न देता निद्रावस्थेत असलेल्या समाजाला जागे करण्यासाठी, विषमतेवर आधारित व्यवस्था उलथून टाकून समतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी, कोणतेही हक्क अधिकार नसलेल्या समाजाला हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी रमाई ने बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसिक खच्चीकरण कधीच केले नाही. म्हणून रमाई एक आदर्श पत्नी, आणि करोडो लोकांची आदर्श आई रमाईला होता आले. संघर्ष व त्यागाचे काय फलीत मिळाले तर आयुष्य भर दहा बाय दहाच्या घरात फाटक्या लुगड्यात दिवस काढणारी रमाई आज करोडो लोकांच्या बंगल्यात आहे. दागिण्याची हाव न केलेली रमाई आज करोडो महिलांच्या ताईत आहे. खऱ्या अर्थाने कर्माचे तेच फळ आहे. रमाईचे आयुष्य फक्त छत्तीस सदुतीस वर्षाचे परंतु वर्षानुवर्षे रमाईचा त्याग, समर्पण, बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेला साथ सहयोग हा आपण विसरू शकत नाही. रमाईचा संघर्ष डोळे पानावरा जरी असेल तरी आज आपल्याला फक्त डोळे ओले करून चालणार नाही. इच्छा मारून, मुलांना गाडून, दागदागीन्याची अपेक्षा न करता समाजाच्या न्याय हक्कासाठी रमाईने बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजाला न्याय हक्क अधिकार व स्वातंत्र्य देऊ शकले. परंतु आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले सर्व काही धोक्यात आहे. म्हणून रमाई जयंती साजरी करताना फक्त रडून फायदा नाही तर रमाईच्या त्याग व संघर्षातून मिळालेल्या गोष्टी वाचण्यासाठी आपल्याला एकत्र येऊन लढावे लागेल. तरच रमाईची जयंती साजरी करून रमईला नतमस्तक होण्याचे सार्थक होईल.

**-विनोद सदावर्ते**
रा. आरेगाव ता. मेहकर
मो. ९१३०९७९३००

# जागरूकतेचा अभाव आणि कर्करोगाचा प्रसार



कॅन्सर, टीबी आणि हार्ट अटॅक यासारख्या आजारांची आकडेवारी कोरोनाच्या काळात समोर येऊ शकली नव्हती. मात्र आता आलेली कर्करोगाची ताजी आकडेवारी देशाची भयावह स्थिती दर्शवते. पंजाब, हरियाणा, हिमाचल आणि चंदीगडमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यसभेत अधिकृत आकडेवारी सादर करताना, केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी स्वत: सांगितले की २०२० ते २०२२ या काळात देशात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत वाढ झाली आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आइसीएमआर) च्या राष्ट्रीय कर्करोग नोंदणी कार्यक्रमानुसार, २०२० मध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या १३,९२,१७९ होती आणि २०२१ मध्ये ती १४,२६,४४७ आणि २०२२ मध्ये १४ ,६१,४२७ वाढली. २०२० मध्ये भारतातील कर्करोगाने मृत्यूचे अंदाजे प्रमाण ७,७०,२३० होते आणि ते २०२१ मध्ये ७,८९,२०२ आणि २०२२ मध्ये ८,०८,५५८ पर्यंत वाढले आहे.

एका प्रश्नाच्या उत्तरात आरोग्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, राज्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या आधारे, आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) कर्करोग, मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, स्ट्रोक प्रतिबंध आणि नियंत्रण (एनपीसीडीसीएस) या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत , राज्ये आणि केंद्र केंद्रशासित प्रदेशांना तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरवली जाते. कर्करोग हा एनपीसीडीसीएस चा अविभाज्य भाग आहे आणि या कार्यक्रमाचा उद्देश पायाभूत सुविधा मजबूत करणे, मानव संसाधन विकास, आरोग्य संवर्धन आणि कर्करोग प्रतिबंध, त्याचे लवकर निदान, व्यवस्थापन आणि कर्करोगासह असंसर्गजन्य रोग (एनसीडी) चे उत्तम आरोग्यसेवा उपचार यासाठी जागरूकता निर्माण करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे.

एनपीसीडीसीएस अंतर्गत, ७०७ जिल्हा एनसीडी केंद्रे, २६८ जिल्हा काळजी केंद्रे आणि ५,५४१ सामुदायिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आणि सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवेचा एक भाग म्हणून सामान्य असंसर्गजन्य रोग, म्हणजे मधुमेह, उच्च रक्तदाब आणि सामान्य कर्करोग यांच्या प्रतिबंध, नियंत्रण आणि तपासणीसाठी लोकसंख्या-आधारित उपक्रम देखील सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत, तीस वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना तोंड, स्तन आणि गर्भाशयाच्या मुखाच्या तीन सामान्य कर्करोगाच्या तपासणीसाठी लक्ष्य केले जाते. २०२२ मध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या १४६१४२७ होती, ज्यामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त होत्या. महिलांची संख्या ७४९२५१ तर पुरुषांची संख्या ७१२१७६ होती. महिला आणि पुरुषांमध्ये सर्वाधिक कर्करोग पचनसंस्थेच्या अवयवांमध्ये (२,८८,०५४), स्तन (२,२१,७५७), प्रजनन प्रणाली (२,१८,३१९), तोंड (१,९८,४३८) आणि श्वसन प्रणाली (१,४३,०६२) मध्ये होतात.

महिला आणि पुरुषांमध्ये वयाच्या ७४ व्या वर्षांपर्यंत कर्करोग होण्याचा धोका नऊपैकी एक असा आहे. पुरुषांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका ६७ पैकी एक आणि महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका २९ पैकी एक असे प्रमाण आहे. इंडियन मेडिकल कौन्सिल ऑफ रिसर्चच्या डिसेंबर २०२२ च्या आकडेवारीनुसार, देशात स्तनाच्या कर्करोगाची सुमारे १,८२,००० प्रकरणे आढळून आली आहेत. २०३० पर्यंत ही प्रकरणे अडीच लाखांपर्यंत वाढू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, २०१८ मध्ये कर्करोगामुळे एकूण ९६ लाख मृत्यू झाले. यापैकी सत्तर टक्के मृत्यू गरीब देशांमध्ये किंवा भारतासारख्या मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये झाले आहेत. याच अहवालानुसार, भारतात कर्करोगामुळे ७.८४ लाख मृत्यू झाले आहेत. म्हणजेच कर्करोगामुळे होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी आठ टक्के मृत्यू हे एकट्या भारतात झाले आहेत.

पंजाब, हरियाणा, हिमाचल आणि चंदीगडमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. पंजाबमध्ये २०१८ मध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या ३६८०१, २०१९ मध्ये ३७७४४ आणि २०२० मध्ये ३८६३६ झाली. हरियाणात २०१८ मध्ये २७६६५, २०१९ मध्ये २८४५३ आणि २०२० मध्ये २९२१९ कॅन्सरची प्रकरणे आढळून आली. हिमाचलमध्ये २०१८, मध्ये ८०१२, २०१९ मध्ये ८५८९ आणि २०२० मध्ये ८७७७ प्रकरणे आढळून आली. चंदीगडमध्ये २०१८ मध्ये ९६६, २०१९ मध्ये ९९४, २०२० मध्ये १०२४ प्रकरणे आढळून आली. सध्या पंजाबमध्ये एक लाख लोकांमागे ९० रुग्ण कर्करोगाने ग्रस्त आहेत. गेल्या सात वर्षांत दरवर्षी सरासरी ७५८६ नवीन प्रकरणे समोर आली आहेत. सरकार कर्करोगग्रस्तांच्या उपचारावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याचा दावा करत असले तरी जनजागृतीअभावी त्याची कहाणी उलटी आहे.

आजदेखील अनेक स्त्रिया लाज आणि भीतीमुळे आजार सांगायला तयार नाहीत. कर्करोगावर उपचार घेत असलेले अनेक रुग्ण कर्करोग हा पिढ्यानपिढ्याचा आजार आहे, असे मानतात, तर वैद्यकीय शास्त्रानुसार केवळ पाच टक्के कर्करोग पालकांकडून मुलांकडे जातो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पंजाबमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढण्यामागे कीटकनाशकांचा अतिवापर हे एक कारण असल्याचे सांगण्यात आले आहे. नैऋत्य पंजाबमधील कापूस पिकवणाऱ्या जिल्ह्यांमध्ये कॅन्सरचे प्रमाण असामान्यपणे जास्त आहे, जे इतर घटकांसह कीटकनाशकांच्या वापराशी संबंधित आहे. जगभरातील देशांमध्ये कर्करोगाविरुद्धचे युद्ध सुरू आहे. पण जितक्या वेगाने उपाय शोधले जात आहेत तितक्याच वेगाने त्याचा प्रसारदेखील होत आहे. मात्र, या आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी देशी पद्धतींद्वारे उपचाराच्या शक्यता शोधण्याचे अनेक प्रयत्न सुरू आहेत. आहारात बदल करून त्यांच्यावर उपचार करण्याचेही काही प्रयत्न चालले आहेत.

असाच एक प्रयोग जादवपूर विद्यापीठाच्या वैद्यकीय विभागात करण्यात आला, ज्यामध्ये दैनंदिन आहारात वापरल्या जाणाऱ्या पदार्थांपासून बनवलेल्या सर्वपिष्टी या औषधाची चाचणी करण्यात आली. औषधाच्या परिणामकारकतेची पातळी तपासण्यासाठी साधारणपणे दोन प्रकारच्या चाचण्या केल्या जातात- पहिली म्हणजे औषधीय (फार्माकोलॉजिकल) चाचणी आणि दुसरी विष विद्यासंबंधी (टोक्सीकोलाजिकल) चाचणी. आयात केलेल्या पांढऱ्या उंदरांवर या चाचण्या करण्यात आल्या. प्राण्यांच्या शरीरात कर्करोगाच्या पेशी प्रविष्ठ करण्यात आल्या आणि जेव्हा ट्यूमर तयार झाला तेव्हा औषध द्यायला सुरुवात केली गेली. 'पोषण ऊर्जा' चाचणी स्थितीत, चौदा दिवसांनंतर आढळलेला प्रतिसाद पाहिला असता, या पेशींची संख्या लक्षणीयरीत्या कमी होऊ लागली होती. प्राण्यांच्या शरीरात अल्सर निर्माण झाले नाहीत.

ट्यूमरच्या वाढीचा दर सहाचाळीस टक्क्यांनी कमी झाला आणि औषधाची विषारीता जवळजवळ शून्य होती. असे सकारात्मक परिणाम अलीकडच्या काळात दिसून आले नव्हते. या औषधामध्ये कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी आणि त्याच्याशी लढण्यासाठी अपार अशी शक्यता आहेत. चाचण्या घेणाऱ्या डॉ. चॅटर्जी यांच्या निष्कर्षांवरून हे औषध कर्करोगाच्या रुग्णांसाठी अत्यंत प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राबरोबरच कर्करोगाच्या रुग्णांच्या उपचारातही त्याचा उपयोग प्रभावी ठरला आहे. परंतु औषधांना मान्यता देणाऱ्या संस्थांनी अजून त्याला मान्यता न दिल्याने ते अद्याप बाजारात उपलब्ध झाले नाही. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की तुमच्या कर्करोगाच्या उपचारात काही दिवसांचा विलंबदेखील घातक ठरू शकतो. दुसरी सकारात्मक गोष्ट म्हणजे थायरॉईड, गर्भाशय आणि स्तनाचा कर्करोग यांसारख्या काही प्रकारच्या कर्करोगाच्या जवळपास इलाज शंभर टक्के पोहचला आहे. टेस्टिक्युलर आणि थायरॉईड सारख्या कर्करोगात, आपण सहजपणे म्हणू शकतो की बरे होण्याची शंभर टक्के शक्यता आहे, परंतु स्वादुपिंड (पेनक्रिएटिक) सारख्या कर्करोगाच्या इतर प्रकारांच्या बाबतीत, जगण्याची शक्यता कमी आहे. खरं तर कोणते संशोधन आपल्याला बरा होण्याच्या जवळ जाईल हे सांगता येणे कठीण आहे. आम्ही खात्रीने एवढेच म्हणू शकतो की औषधे, केमो आणि रेडिएशनद्वारे उपचार चांगले होत आहेत.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# आदर्श मुख्याध्यापिका विजयाताई लोंढे-सुगावकर



श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्था संचलित श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल कापसी (बु.) ता. लोहा या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विजयाताई लोंढे जाधव-सुगावकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आज सेवापूर्ती सोहळा शाळेच्या प्रांगणामध्ये श्री संत बाळगीर महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमीत हा सेवापूर्ती सोहळा पार पडतो आहे.

या सेवापूर्ती सोहळ्यासाठी श्री संत बाळगीर महाराज मठ संस्थान कापसी गुंफाचे श्री महंत देवगिरी महाराज, श्री संत बाळगीर मठ संस्थान डोलाराचे श्री श्री श्री १००८ अष्टकौशल्य महंत प्रयागगिरी महाराज आदींची उपस्थिती राहणार आहे.

सौ. विजयाताई लोंढे म्हटले की, संघर्षशील व्यक्तिमत्व, निर्भीडशैली, प्रशासनातील जाणकार असणारी कुशल व्यक्ती, एक प्रतिभावंत व्यक्तिमत्व, अफाट प्रतिभेच्या धनी, नेतृत्व, वक्तृत्व, कर्तृत्व यांचा सुंदर मिलाप असणाऱ्या ताई म्हणजेच मुख्याध्यापिका सौ. विजयाताई लोंढे. श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहनराव पाटील सुगावकर यांचे मार्गदर्शन नेहमीच त्यांना असते. मोहनराव पाटील सुगावकर म्हटलं की आठवते...

'तुझे तेज अंगी
शतांशे जरीही
उजाळून देऊ दिशा दाही दाही'

असं हे अष्टपैलू व्यक्तिमत्व दिसताच क्षणी त्यांच्या चरणी नतमस्तक व्हावे आणि म्हणावे, समाजात अनेक प्रकारचे लोक असतात. कुणी आर्थिक दृष्टीने श्रीमंत असतात तर कोणी मनाने श्रीमंत. पैशाने श्रीमंत असूनही मनाने श्रीमंत झालेले फार कमी असतात.

गेल्या अनेक वर्षात शाळेच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आम्हा सर्व शिक्षकांना कधीही काहीही कमी पडू दिले नाही. 'जिथे कमी तिथे आम्ही' या उक्तीप्रमाणे शिक्षकांसोबत अडचणीमध्ये मुख्याध्यापिका सुगावकर नेहमी पाठीशी राहिल्या आहेत.

सौ. विजयाताई लोंढे अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या धनी आहेत. शाळेतल्या मुलींकडे त्यांचं विशेष लक्ष होतं. स्वतः स्त्री असल्यामुळे स्त्रियांच्या समस्या काय असत हे त्यांना माहीत होते. स्वतः ते ग्रामीण भागातून आल्यामुळे त्यांना ग्रामीण भागातील वेदना परिस्थिती यांची जाणीव होती. गोरगरीब लोक शिक्षणापासून कशाप्रकारे वंचित राहतात हे त्यांना माहीत होते. सावित्रीची लेक शिकली पाहिजे हा त्यांचा मानस. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची मानव विकास मिशनची बस मुलींसाठी सुरुवात करण्याचा सिंहाचा वाटा हा सौ. विजयाताई लोंढे यांचा आहे. पूर्वी ही मानव विकास मिशनची बस क्रमांक आठ. पिंपळदरी, करमाळा, हिंदोळा या गावांना जायची. पण डोलारा व कांजाळा येथील मुली पायी येत असत. शाळेला पायी येत असताना बऱ्याच काही दुर्घटना सुद्धा घडल्या होत्या. कारण पायी रस्त्याने येत असताना बाजूलाच एक तलाव होता. त्या तलावामध्ये कधीकधी मुलींचा पाय घसरत असे, अशाही परिस्थितीमध्ये मुलींनी शाळा सोडली नाही. हा त्रास कुठेतरी कमी व्हावा यासाठी त्यांनी डोलारा व कांजाळा या दोन गावचा ठराव घेऊन मानव विकास मिशनची बस डोलारा आणि कांजाळाला जोडली.

ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा गुणवत्तेमध्ये कमी नसतात हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली. शाळेमध्ये विविध उपक्रमासोबत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर राबवले.

मराठी हा विषय त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी विशेष अशा प्रकारचे मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी शाळेमध्ये बोरची व्यवस्था केली. त्यांना चक्रधर स्वामीचे लीळाचरित्र ग्रंथ हे विशेष आवडायचे. सतत गुरुच्या सानिध्यात त्यांचे जीवन गेले. अशा या मुख्याध्यापिका बद्दल लिहिण्यासाठी शब्द सुद्धा अपुरे पडतात. असे हे नेतृत्व व्यक्तिमत्व आदरणीय सौ. विजयाताई जाधव सुगावकर मॅडम. आपणास दीर्घ आयुष्य लाभो. भविष्यात आपल्या हातून समाजाचे कल्याण व्हावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि माझ्या लेखणीस पूर्णविराम देतो.

**-गोविंद अमृतवाड.**
श्री संत बाळगीर महाराज
हायस्कूल कापसी (बु.)
ता. लोहा.जि.नांदेड.

# क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचं निधन



**मुंबई :** लोकप्रिय क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. संझगिरी यांनी मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. पेशानं सिव्हिल इंजिनीयर असलेले संझगिरी मुंबई महापालिकेत उच्च पदावर कार्यरत होते. पण क्रिकेट आणि मराठी साहित्यातल्या रुचीनं त्यांच्यातला क्रिकेट समीक्षक घडवला. मराठी क्रिकेटरसिकांनी त्यांच्या लिखाणाला नेहमीच पसंतीची दाद दिली. संझगिरी यांच्या पार्थिवावर उद्या दुपारी १२ वाजता शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होतील.

द्वारकानाथ संझगिरी यांनी एकाच वेळी दोन क्षेत्रांत काम केले, त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेत अभियंता म्हणून नोकरी केली. तेथून ते २००८ मध्ये मुख्य अभियंता, पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून सेवानिवृत्त झाले. त्याचबरोबर त्यांनी स्तंभलेखक, लेखक आणि सूत्रसंचालक म्हणूनही आपली एक वेगळी ओळख बनवली. १९७० च्या उत्तरार्धात लेखन कारकीर्द सुरू करून त्यांच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी ङ्गदिनांकफ आणि ङ्गश्रीफ यासारख्या मासिकांमध्ये नियमितपणे योगदान दिले. भारताने इंग्लंडमध्ये १९८३ चा वर्ल्ड कप जिंकल्यानंतर, त्यांनी इतर काही मित्रांसह ङ्गएक षटकारफ हे पाक्षिक क्रीडा मासिक सुरू केले होते, ज्यासाठी द्वारकानाथ संझगिरी यांनी कार्यकारी संपादक म्हणून काम केले.

द्वारकानाथ संझगिरी यांनी १९८३ पासून ते आजपर्यंतचे सर्व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट वर्ल्ड कप देखील कव्हर केले आहेत. स्तंभलेखनाव्यतिरिक्त, संझगिरी यांनी प्रवास, सामाजिक समस्या, क्रीडा आणि चित्रपट अशा विविध विषयांवर ४० पुस्तके लिहिली आहेत.

## थोडक्यात...

### दहावी,बारावी परीक्षेसाठी हेल्पलाईन कार्यान्वित

**नांदेड (प्रतिनिधी) –** फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावी परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. १० वी साठी ०२३८२-२५१६३३ तर १२ वी साठी ०२३८२-२५१७३३ हा हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. या हेल्पलाईनसाठी नियुक्त केलेले नावे व भ्रमणध्वनी पुढीलप्रमाणे आहेत. कुंभार ए.आर (सहाय्यक सचिव) मो.नं. ९४०५०७७९९१, उच्च माध्यमिक बारावीसाठी कारसेकर जे. एस. (व.अ.) मो.नं. ९८२२८२३७८०, डाळींबे एम.यु. (प.लि.) मो.नं. ९४२३७७७७८९, जानकर एच.एस. (व.लि.) मो.नं. ९७६४४०९३१८ आहेत.

### सामाजिक न्याय विभागाच्या पुरस्कारांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी) –** सामाजिक न्याय विभागामार्फत समाज कल्याण क्षेत्रामध्ये वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांसाठी शासनाने विविध पुरस्कार जाहीर केले आहेत. या पुरस्कारांसाठी १५ फेब्रुवारी शेवटची तारीख असून तत्पूर्वी अर्ज दाखल करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे. अर्जाचा नमुना समाज कल्याण विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील अर्ज सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय नांदेड यांच्याकडे तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

# नांदेड रेल्वेस्थानक, बसस्थानक, लिंगायत स्मशानभूमी आणि रेल्वेस्थानक ते शिवाजी महाराज पुतळा परिसर सीसीटीव्हीच्या नजरेत

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी व प्रवाशांची मोठी वर्दळ असलेल्या रेल्वेस्थानक, मध्यवर्ती बसस्थानक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा हा रस्ता पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या पुढाकाराने सीसीटीव्हीच्या नजरेखाली आला आहे. या भागात प्रवाशांची पाकीटमारी किंवा एखाद्यावर हल्ला अशा घटनांवर आळा बसेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. इतर भागातही सीसीटीव्ही कॅमेरे कधी बसविले जाणार आहेत, असा सवालही उपस्थित केला जात आहे. एवढेच नाही तर महापालिकेच्यावतीने बसस्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर येणारी काटेरी झाडे तोडून रस्ता साफ करण्यात आला आहे.





नांदेड शहरातील संवेदनशील आणि अती महत्त्वाचे ठाणे म्हणून वजिराबाद पोलीस ठाण्याकडे पाहिले जाते. शहराचे सर्व मुख्य कार्यालय या ठाण्याच्या कार्यक्षेत्रात येतात. ज्यात हुजूर साहेब रेल्वेस्थानक, मध्यवर्ती बसस्थानक, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय, जिल्हा परिषद, मुख्य टपाल कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती यासह आदी कार्यालये याच ठाण्याच्या हद्दीत कार्यरत आहेत. वजिराबाद मुख्य बाजारपेठ याच हद्दीत असल्याने तसेच रुग्णालयांची संख्या मोठी असल्याने (त्यात डॉक्टर लेन आणि बोरबन फॅक्टरी) या भागात बाहेर जिल्ह्यातून येणाऱ्यांची रहदारी मोठी आहे. विशेष म्हणजे शिखांची दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणारा सचखंड गुरुद्वारा आणि लंगर साहेब गुरुद्वारा याच ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने देश-विदेशातून मोठ्या प्रमाणात भाविक दररोज या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. वजिराबाद ठाण्याच्या हद्दीत प्रवाशांना तसेच भाविकांना आणि रहिवाशांना कुठेही अडचण येणार नाही यासाठी वजिराबाद पोलीस पथक सतत रस्त्यावर असते.

मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वेस्थानक परिसरात मागील काही दिवसांपासून पाकीटमारांचा सुळसुळाट तसेच नशेबाज युवकांचा हैदोस पाहायला मिळत होता. रस्त्यावर दारू पिऊन धिंगाणा घालणारे आणि गोरगरीब प्रवासांना धमकावून त्यांच्याकडून मोबाईल पैसे जबरी लुटण्याच्या घटना घडत होत्या. पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) कीर्तीका सी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वेस्थानक आणि महापुरुषांचे पुतळा परिसर या भागात त्याच भागातील समाजसेवकांना बोलून त्यांच्याकडून सीसीटीव्ही कॅमेरे लावून घेतले आहे. या भागात जवळपास ९ ते १२ कॅमेरे लावले आहेत.

यासोबतच डंकीन परिसरात असलेल्या लिंगायत स्मशान भूमीकडे जाणारा रस्ता असुरक्षित होता. विशेष म्हणजे स्मशान भूमी परिसरात लगातार तीन खून झाले होते. अंधार आणि झुडपांचे साम्राज्य या भागात पसरल्याने सराईत दारू पिणारे गुन्हेगार रेल्वेतील पाकीटमार त्या भागात जाऊन दारू पिणे व नंतर वाद घालून खून करणे असे प्रकार सतत घडत होते. या परिसरात महापालिकेच्या वतीने काटेरी झुडपे तोडून परिसर स्वच्छ करण्यात आला आणि पोलिसांच्या पुढाकारातून या ठिकाणी सुद्धा सीसीटीव्ही कॅमेरा आणि हाय मॅक्स लाईट बसविण्यात आला आहे. शहराच्या अनेक भागात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज असून कॅमेरे कधी बसविले जाणार असा सवाल विचारला जात आहे.

## नांदेड रेल्वे पोलिसांच्या सतर्कतेमुळे वाचला एकाचा प्राण; ट्रेनसमोर आलेल्या युवकाला केले अलगद बाजूला



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील हुजूर साहेब रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक एकवर येत असलेल्या काचीगुडा- नारखेड एक्स्प्रेसच्या समोर पुढे घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवकास लोहमार्ग पोलिसांनी वाचविले. ही घटना गुरुवार ६ फेब्रुवारीच्या दुपारच्या सुमारास घडली. आशिफ अंसारी (वय २७ वर्षे रा. फुल्ली ता.कुद्रा जि. कैमुर भबुना) असे आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवकाचे नाव आहे.

६ फेब्रुवारी रोजीचे दुपारी १२.३७ वाजताच्या सुमारास काचीगुडा- नरखेड एक्स्प्रेस नांदेडच्या रेल्वेस्थानकात एक नंबर फलाटावर येत असतांना आशिफ अंसारी याने आत्महत्या करण्याच्या इराद्याने धावत्या ट्रेनसमोर येवुन पटरीवर झोपला. लोकांचा हाहाकार माजल्याने स्टेशन गस्त करीत असणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत पांचाळ व त्यांचे सोबत पोलीस हवालदार राजू राठोड व अंमलदार गजभे यांनी तात्काळ धाव घेत त्यास पटरीवरुन बाजुला केले. त्यास विश्वासात घेवून पोलीस ठाण्यात आणले. त्यास आत्महत्येचे कारण विचारले असता घरगुती कारणावरुन रागाच्या भरात नांदेडला निघून आल्याचे त्याने सांगितले. रागाच्या भरात आत्महत्या करीत असल्याचे सांगीतल्याने त्यास विश्वासात घेवुन त्याचे समुपदेशन करुन मनपरीवर्तन केले व समजूत घातली. हवालदार पुरी यांनी त्याचे सोबत कामास असलेल्यांची माहिती घेतली. त्याच्या चुलत भावाला पोलीस ठाण्यात बोलावून घेतले आणि योग्य ती कार्यवाही करुन सुखरुप त्याच्या ताब्यात देण्यात आले. सदर व्यक्तीचा जीव वाचविण्यास पोलीस हवालदार राजू राठोड व पोलीस अंमलदार गजभे यांनी मोलाचे कर्तव्य केले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले.

## महिलांनी आरोग्याची काळजी घ्यावी -डॉ. मुरमुरे

### नांदेड शहरात महिला मेळावा उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी) –** कौटुंबिक जबाबदारी पेलताना अथवा नोकरीत असताना आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. वाढत्या आरोग्यविषयक समस्या लक्षात घेऊन महिलांनी नोकरी आणि कुटुंबासोबतच स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन डॉ. मंजुषा मुरमुरे यांनी केले.

आंध आदिवासी समाजाच्या वतीने ३ फेब्रुवारी रोजी रेड्डी गार्डनमध्ये महिला मेळावा घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी बीएसएनएल अधिकारी जयश्री डोखळे तर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी प्रतिभा बोथीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महिला मेळाव्यात हळदी कुंकू, स्नेह मिलन तसेच सांस्कृतिक, मनोरंजनात्मक आणि कलात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या महिलांना वृक्ष व ग्रंथ भेट देण्यात आले. विविध स्टॉल मधून घरगुती वस्तूंची विक्रीही झाली. महिलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल सर्व महिलांचे सामाजिक कार्यकर्ते गंगाधर वानोळे यांनी अभिनंदन केले.

मेळाव्याचे सूत्रसंचालन डॉ. जयश्री आढाव व छाया भुरके यांनी केले. प्रास्ताविक सूर्यकांता मिराशे तर आभार वंदना नाईक यांनी मानले. कार्यक्रमास ३५० पेक्षा जास्त आदिवासी महिलांची उपस्थिती होती.

## पाणी द्या हो पाणी... पोमनाळा ग्रामस्थांचा प्रशासनाकडे पाण्यासाठी टाहो

### पाण्यासाठी तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू

**भोकर (प्रतिनिधी) –** भोकर-म्हैसा महामार्गावरील पोमनाळा गावात पिण्याच्या पाण्यासाठी मागील अनेक दिवसापासून ग्रामस्थांची मोठी भटकंती होत आहे. पाण्याची व्यवस्था करून ग्रामस्थांचे पाण्यासाठी होणारे हाल थांबवावे या मागणीसाठी दि. ४ फेब्रुवारीपासून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाप्रमुख गोविंद सोळंके यांनी तहसीलसमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे.



उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच मागील अनेक दिवसांपासून पोमनाळा गावातील पाणीपुरवठा योजनेतील विहीर बोर पूर्णतः अटल्याने भीषण पाणीटंचाई निर्माण झाली. सांडपाणी मिळणे तर दूरच पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना प्रशासनाकडे चकरा माराव्या लागत आहे. पाणी मिळेल का हो पाणी... असे म्हणत येथील महिला बालक, पुरुषांना मोठी भटकंती करावी लागत आहे. ग्रामस्थांना गावापासून दीड ते दोन किलोमीटर अंतरावरील चिंचाळा पाटी व इतर ठिकाणांहून पाणी मोटरसायकल, सायकल, बैलगाडी व महिलांना डोक्यावर आणावे लागत आहे.

गावात परिपूर्ण पाणी असलेली जुनी विहीर अधिग्रहण करून गावासाठी पाणीपुरवठा करावा परंतु त्यापूर्वी टँकरद्वारे गावात पाणीपुरवठा करून ग्रामस्थांचे पाण्याविना होणारे हाल दूर करावे अशी मागणी भोकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक केशव पाटील पोमनाळकर यांनी केली. तर निवेदनकर्ते गोविंद सोळंके यांनी गावातील पाण्याची समस्या तात्काळ दूर न केल्यास अमरण उपोषण करण्याचा इशारा तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला होता.

परंतु दिलेली तारीख लोटून गेल्यावरही प्रशासनाच्या वतीने कसलीही उपाययोजना न केल्याने गोविंद सोळंके ४ फेब्रुवारीपासून भोकर तहसील कार्यालय समोर अमरण उपोषणास बसले आहेत.

## अर्धापूर येथे दिव्यांगांचे रोगनिदान शिबिर संपन्न

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात विकलांग विद्यार्थ्यांचे आरोग्य शिबीर घेण्यात आले. तसेच कर्करोग दिनानिमित्त तोंडाचा, गर्भाशय, स्तनाचा कॅन्सर यावर दि. ४ रोजी मार्गदर्शनपर शिबीर घेण्यात आली. यावेळी तालुक्यातील अनेक रुग्ण उपस्थित होते.

यावेळी अधिक्षक डॉ. विद्या झिने, डॉ अनंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संतोषी अंतापूरकर, डॉ. युवराज दाढाळे, डॉ. महम्मद शाहीन, डॉ. विशाल लंगडे, डॉ. मुकेश टाक, डॉ. सविता जावंत्रे यांनी रक्त नमुने, डोळ्यांची तपासणी केली. शिबिरासाठी गटशिक्षण अधिकारी लोकदाजी गोडबोले, विषय तज्ञ एस. जि. केसराळीकर, डॉ. संगमवार, साहाय्यक अधिसेविका प्रभावती ससाने, दहेकर, ए. एम. वारे, एस. जी. खिल्लारे, एम. एल. गायकवाड आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## अनुसूचित जाती वर्गीकरण अंमलबजावणी आंदोलनात सहभागी व्हा -के.मूर्ती

**किनवट (प्रतिनिधी)–** अनुसूचित जातीच्या 'अबकड' वर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी एमआरएसपीचे राष्ट्रीय अध्यक्ष मंदा कृष्णा मादिगानी यांनी दि. ७ फेब्रुवारी रोजी हैदराबाद येथे व्यापक जनआंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात नांदेड जिल्ह्यातील मातंग समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन येथील माजी नगराध्यक्ष, मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते के.मूर्ती यांनी केले आहे.



अनुसूचित जातीच्या 'अबकड' वर्गीकरणासाठी देशातील सर्व प्रमुख पक्षातील नेत्यांनी लेखी समर्थन दिले आहे. वर्गीकरणासाठी सर्वोच्च न्यायालय देखील अनुकूल असताना काहींनी वर्गीकरण अंमलबजावणीच्या विरोधी भूमिका घेतली आहे. त्यामुळे अंमलबजावणी होत नसल्याने मादिगा, मातंग तत्सम वंचित उपेक्षित समाजाच्या वर्गीकरण अंमलबजावणीसाठी हैदराबाद येथे दि.७ रोजी जनआंदोलन आयोजित करण्यात आले आहे. एक लाख हालगी लोककलावंतांचा बुलंद आवाज सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्रातील मातंग, तत्सम वंचित, उपेक्षित समाजाने हालगी आंदोलनात पुरुष, महिला, युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मूर्ती यांनी केले आहे.

## पंधरा मार्चपर्यंत ऊस शिल्लक राहणार नाही -सुभाष देशमुख




**हदगाव (प्रतिनिधी) –** शिउर साखर कारखाना लिमिटेड वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लिमिटेड हडसनी हे दोन्हीही कारखाने पंधरा दिवस उशिराने चालू झाले. ऑक्टोबर महिन्याचे ऊस क्षेत्र जास्त असल्याने ऊस तोडणीचा विलंब होत आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी इतरत्र कारखान्याला ऊस देऊ नये दोन्ही कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्वांचाच ऊस १५ मार्चपर्यंत नेण्यात येईल, असे श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड हडसणी कारखान्याचे अध्यक्ष सुभाषराव देशमुख यांनी सांगितले.

कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांच्या सहकार्याने गाळप हंगाम २०२४-२५ यशस्वीपणे चालू आहे. दोन्ही कारखान्यात दररोज आठ हजार मेट्रिक टन उसाचे गाळप होत आहे. शासन निर्णयामुळे झालेला विलंब पाहता ऊस तोडणीस विलंब लागत आहे. असे असले तरी कळमनुरी, हदगाव, हिमायतनगर व उमरखेड या भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस उचलण्यात येईल, असे आश्वासन कारखान्याचे अध्यक्ष सुभाषराव देशमुख यांनी दिले आहे

यंदा भरपूर पर्जन्यमान झाले असून धरणाच्या पाणीसाठ्यात सुद्धा वाढ झालेली आहे. इतर प्रत्येक कारखान्याच्या कार्यक्षेत्रात भरपूर प्रमाणात ऊस लागवड झाली असून पुढील वर्षी ते कारखाने आपला ऊस गाळपास घेणार नाहीत. त्यामुळे आपण इतरत्र कारखान्याला आपला ऊस न देता शिऊर सहकारी कारखाना लिमिटेड वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड हडसनी या दोन्ही कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करण्याचे आवाहनही देशमुख यांनी केले.

## सिडको सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी त्र्यंबक कदम तर सचिवपदी साहेबराव गाडे

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ बिग्रेड २०२५ चा अध्यक्षपदी त्र्यंबक कदम तर सचिवपदी साहेबराव गाढे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.





सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची बैठक ३ फेब्रुवारी रोजी सिडको येथील जिजाऊ सृष्टी येथे संपन्न झाली. यावेळी बैठकीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष त्र्यंबक कदम, सचिव साहेबराव गाढे, कोषाध्यक्ष वसंतराव कदम, उपाध्यक्ष रघुनाथ ताटे, मधुकर गायकवाड, कोषाध्यक्ष वसंतराव कदम, सहसचिव विनोद वंजारी, दीपक भरड, सह कोषाध्यक्ष उत्तमराव जाधव, संघटक नामदेव चव्हाण, सदस्य ब्रम्हाजी वडजे, अशोक कदम, बालाजी हिवराळे, प्रमोद गाडेकर, संदिप कदम, गोविंदराव मजरे, शेख मोईन लाटकर, कोंडीबा घोरबांड, एकनाथ पाटील, सुभाष सुर्यवंशी यांची निवड करण्यात आली. यावेळी संजय घोगरे, दिगांबर शिंदे, उत्तम जाधव, तिरूपती घोगरे, सोपानराव पांडे, संकेत पाटील, सतिश बस्वदे, दिलीप कदम, भगवानराव ताटे उपस्थित होते.

## नवीन मेंडका येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**मुदखेड (प्रतिनिधी)–** नवीन मेंढका येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि. ३१ जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. चिमुकल्यांचे विविध कलागुण व कलाविष्कार पाहून सर्वांनी कौतुक केले.

पोलीस निरीक्षक वसंत सप्रे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भाजपचे शहर प्रभारी माधवराव कदम, बीट जमादार विजय आलेवाड, कौठेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवी निखाते, माजी सरपंच लक्ष्मणराव ईजळकर, उपसरपंच नारायण निखाते, तंटामुक्ती अध्यक्ष प्रशांत निखाते, पोलीस पाटील गोविंदराव वसुरे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष बालाजीराव नागलवाड, माधवराव वसुरे, कुसुमवाड, दासरे, तसेच इंदिरा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक चंदलवाड, केळकर, शिंदे, दूधंबे, पावडे उपस्थित होते.

यावेळी पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी मार्गदर्शन केले. जीवनामध्ये बदल कसा घडवावा, विद्यार्थीदशेमध्ये आपण शिकले पाहिजे असे त्यांनी पटवून सांगितले. माधवराव कदम यांनीही मार्गदर्शन केले. गणरायाच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दैवत छत्रपती, मला बाई रात्री सपन पडलं भारतरत्न भिमाच, लल्लाटी भंडार, पापा मेरे पापा, ठाकर ठाकर या रानाची पाखरं, तेरे मिट्टी मे मर जावा, जलवा तेरा जलवा, मी हाय कोळी, राणी तुझ्या नशिबाचा झाला वडापाव अशा एक ना अनेक गाण्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. पवार सर यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास धुतराज यांनी केले. मुख्याध्यापकांनी सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक रामेश्वर बोदमवाड, उमाकांत पवार, कैलास धुतराज यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून...

**निवडणुकीत लाडक्या बहिणींन...**

मी आजही डेडीकेटेड टू कॉमन मॅन म्हणून काम करत आहे. मुख्यमंत्री असतानाही लोकांच्या सेवेत काम केले. माझ्या शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मी आपल्यासाठी काम करणार आहे असा विश्वास त्यांनी दिला. लोकसभा, विधानसभा निवडणुका झाल्या. आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत ज्या कार्यकर्त्यांनी तुम्हाला निवडून आणलं आता त्यांच्यासाठी काम करा. त्यांना जपा असे आवाहनही प्रमुख लोकप्रतिनिधींना त्यांनी केले.

पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, नांदेड हे ऐतिहासिक शहर आहे. या शहरासाठी मागच्या अडीच वर्षात मुख्यमंत्री राहिलेले एकनाथ शिंदे यांनी भरभरून दिले. साडेतीन हजार कोटी रुपये एका आमदाराला दिले जे की मी मंत्री असताना मला निधी उपलब्ध करून घेता आला नाही. या जिल्ह्यात शिवसेना वाढविली पाहिजे. उबाठा शिवसेना खऱ्या अर्थाने संजय राऊत यांनी संपवली. आम्ही शिवसेनेची धुरा खांद्यावर घेऊन बाळासाहेबांचे विचार पेरीत निघालो आहे. विधानसभा निवडणुकीत ८० जागा लढलो त्यापैकी ६० जागी विजयी झालो. शिवसेना वाढीसाठी आम्ही अंगावर केसेस घेतल्या, पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या, संजय राऊत यांच्यावर एक तरी केस झालेली त्यांनी दाखवावी.

आमदार हेमंत पाटील म्हणाले की, ठाणे, अमरनाथ आणि उल्हासनगरच्या धर्तीवर नांदेड प्राधिकरण करा. हळद संशोधन केंद्राचे काम बंद केले आहे ते पुन्हा सुरू करा. पैनगंगा नदीवरील उभारण्यात येणारे बंधारे यांचे काम मार्गी लावा. महाराष्ट्राचे विभाजन करणारी ताकद या ठिकाणी काम करत आहे. त्यासाठी आपल्याला सर्वांना सजग राहावे लागणार आहे. अशोकराव चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत दिले परंतु आपणही त्यांना तोडीसतोड उत्तर देऊ. देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांची कारणामे त्यांच्या कानावर टाकले आहेत. त्यांनीही त्यांना समज दिल्याचे हेमंत पाटील म्हणाले.

आमदार बालाजी कल्याणकर म्हणाले की, अडीच वर्षात केलेल्या कामाची पावती म्हणून मला मतदाराने निवडून दिले. महायुतीचा विजय झाला. महाविकास आघाडीच्या काळातील अडीच वर्षात मला निधी मिळाला नाही परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात मला साडेतीन हजार कोटींचा निधी मिळाला. नांदेड उत्तरचा चेहरा बदलून टाकला आहे. नांदेडचे नेतृत्व करणारे अशोक चव्हाण यांचे नाव न घेता आम्हाला खूप त्रास देत आहेत. तो त्रास आम्हाला सहन होत नाही. याकडे आपण स्वतः लक्ष घालावे असे आवाहन त्यांनी एकनाथ शिंदे यांना केले. नांदेड शहरातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने या ठिकाणी दोन तहसील कार्यालय तसेच राहिलेले अर्धवट कामे पूर्णत्वास, उत्तर मतदारसंघात एमआयडीसीची क्रीडा संकुल करावे अशी त्यांनी मागणी केली. मला ५० हजारची लीड मला भेटत होती, परंतु भाजपच्या काही मंडळींनी माझ्या विरोधात पैसे वाटले परंतु मी त्यांनाही पुरून उरलो. हे खऱ्या अर्थाने माझ्या कामाची व आपल्या आशीर्वादाची किमया मी समजतो.

आमदार आनंदराव बोंढारकर म्हणाले की, केवळ आणि केवळ मी एकनाथ शिंदे साहेबांमुळे आमदार झालो. उत्तर विधानसभेसाठी जसा निधी दिला तसाच निधी माझ्या दक्षिण मतदार संघात द्यावा. कारण दक्षिण मतदार संघात अर्ध्याहून अधिक शहराचा भाग आहे आणि आपल्याकडे नगर विकास मंत्रालय असल्यामुळे या मतदार संघाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आपण मलाही मोठा निधी द्याल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार बाबुराव कोहळीकर, जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, राजश्री पाटील, प्रल्हाद इंगोले यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लाडक्या बहिणी, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. यावेळी अनेकांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. ज्यात परभणीचे उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख विशाल कदम व त्यांची टीम, वाशिमचे जिल्हाप्रमुख सुरेश मापारे आणि त्यांची टीम यासोबतच काही नांदेड शहरातील माजी नगरसेवक मुकुंद जवळगावकर यांच्यासह अन्य पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदिवासी समाज बांधवांनी आदिवासी नृत्य सादर करून स्वागत केले.

**समृद्धी महामार्ग प्रमाणे...**

शक्तिपीठ महामार्गाचे महत्व कळल्यावर. भविष्यातील दळणवळणाचे व विकासाचे महत्त्व पटल्यानंतर, विरोध मावळतो. शक्तिपीठ महामार्ग कुठेही जनतेवर लादणार नाही, असे सांगताना जिथे विरोध आहे तिथे काम केले जाणार नाही. त्याठिकाणी रस्त्याची अलाइनमेंट बदलली जाईल. त्याचवेळी त्या-त्या भागाची कनेक्टिव्हिटीही महत्त्वाची आहे.

# युवा

व्हॅलेंटाइन्स विक स्पेशल



## ‘ही’ ५ आश्वासनं नात्याला देतील कलाटणी

**फेब्रुवारी महिन्यातील ७ ते १४ तारखेपर्यंत प्रत्येक दिवस प्रेमीयुगुलांसाठी खूप खास असतो. पण प्रेमाने भरलेल्या या संपूर्ण आठवड्यात साजरा केला जाणारा पाचवा दिवस म्हणजेच प्रॉमिस डेची प्रत्येक जोडपे आतुरतेने वाट पाहत असते. या दिवशी जोडपी फक्त आपल्या भावनाच एकमेकांसमोर व्यक्त करत नाहीत तर नातं आणखी दृढ करण्यासाठी आणि चिरंतन काळासाठी एकमेकांचे राहण्यासाठी अनेक आश्वासने देतात व प्रेमाच्या आणाभाका खातात. जिथे आपल्या जोडीदारास आठवड्याच्या सुरुवातीच्या काही दिवसांत मनमोहक फुले किंवा पुष्पगुच्छ, चॉकलेट्स आणि टेडी देऊन आनंदित केले जाते. पण हा दिवस मात्र कोणत्याही भेटवस्तूने नव्हे तर प्रेमाच्या शब्दांनी सजविला जातो. आशेचे, प्रेमाचे, विश्वासाचे शब्द हे कोणत्याही संपत्ती, पैसा, गिफ्ट्सपेक्षाही खूप मोलाचे असतात. आपल्या जोडीदाराने या दिवशी दिलेल्या आश्वासनांमुळे नात्यातील वीण अधिक घट्ट होण्यास मदत होते. पण अशी कोणती आश्वासनं आहेत जी या दिवशी दिल्यास नातं बहरतं?**

### जसे आहात तसेच राहा

म्हणतात ना की एक आनंदी आणि परिपूर्ण नातं तेच असतं जिथे दोन लोक एकमेकांना जसे आहेत तसे स्वीकारतात. तुम्हालासुद्धा आपल्या जोडीदाराशी असलेलं नातं अधिक दृढ व घट्ट करायचे असेल तर त्यांना promise day या खास दिवशी निश्चितपणे सांगा की ते तुम्हाला आहे तसेच आवडतात. त्यामुळे तू आहेस तसाच किंवा तशीच कायम राहा. नात्यात येण्याचा अर्थ असा मुळीच नाही की आपण आपल्या जोडीदारास आपल्या पद्धतीने वागण्यास जबरदस्ती करावी. आपल्या जोडीदारामध्ये जर कोणतीही कमतरता तुम्हाला दिसली तर त्यांना ती कमतरता किंवा चूक लक्षात आणून द्या. त्या एका गोष्टीसाठी त्या पूर्ण माणसालाच बदलण्याचा प्रयत्न करू नका.

### नातं कधीही तुटणार नाही

यात काही शंका नाही की आयुष्याच्या मार्गावर चालत असताना आपल्याला अशा बऱ्याच परिस्थितींचा सामना करावा लागतो, ज्याचा आपल्या नात्यावरही आपसुकच परिणाम होत जातो. पण या काळात प्रत्येक जोडप्याने संयम व समजूतदारपणे वागले पाहिजे. त्यामुळे प्रत्येक जोडप्याने प्रॉमिस डेच्या मोक्यावर एकमेकांना वचन दिले पाहिजे की नात्यात कितीही उतार-चढाव आले तरीही आपल्यातील संबंध कधीच खराब होणार नाहीत.

### नात्याला वेळ देऊ

आजकालच्या धावपळीच्या काळात लोक सहसा आपल्या आवडत्या नात्याला वेळ देणंच विसरतात. ते विसरतात की कधीकधी वेळेच्या अभावामुळे त्यांचे नाती तुटण्याच्या मार्गावर येते. या प्रॉमिस डेला आपल्या जोडीदारास वचन द्या की कामात व्यस्त असतानाही तुम्ही त्यांना आवर्जून वेळ द्याल. दिवसातील ठराविक वेळ हा फक्त त्यांचा असेल हे आश्वासन त्यांना द्या. वेळ ही अशी गोष्ट आहे की ज्यामुळे आजवर अनेक चांगली चांगली नाती उद्ध्वस्त झाली आहेत. तुम्हाला या यादीत आपल्या नात्याचं नाव येऊ नये वाटत असेल तर जोडीदाराला हा विश्वास द्याच.

### एकमेकांची काळजी घेऊ

प्रत्येक जोडप्याने एकमेकांना वचन दिले पाहिजे की ते नेहमी एकमेकांची काळजी घेतील. हे वचन यासाठी गरजेचे आहे. कारण नात्यात असताना लोक एकमेकांवर प्रेम तर जीवापाड करतात, पण एकमेकांची काळजी घेणंच विसरून जातात. ज्यामुळे दोन लोकांमधील अंतर वाढू लागते. जर आपण एकमेकांच्या छोट्या छोट्या गोष्टींची काळजी घेत असाल तर आमच्यावर विश्वास ठेवा, तुमचे नाते दिवसेंदिवस अधिक बहरत जाईल. त्यामुळे प्रेमासोबतच काळजीही घेईन हे आश्वासन आपल्या जोडीदाराला promise day च्या दिवशी नक्की द्या.

### टीम वर्कसारखं नातं सांभाळू

पती-पत्नीचे बंधन असो किंवा प्रेयसी-प्रियकराचे संबंध असो, टीम वर्कशिवाय कोणतेही नाते पुढे जाऊ शकत नाही. जर तुम्हाला खरोखरच आपलं नातं आणखी एक पाऊल पुढे घेऊन जायचं असेल तर मग एकमेकांना आणि स्वतःलाही वचन द्या की तुम्ही दोघंही आपलं नातं एका टीमप्रमाणे चालवाल. इतकेच नाही तर स्वयंपाकघर स्वच्छ करणं असो किंवा मग घरातील कामाची कोणतीही जबाबदारी, या सर्व कामात दोघे भागीदार होऊ हे आश्वासन एकमेकांना द्या.

# प्रेमाच्या दिवशी निवडा खास गुलाबाचा रंग!

**तुम्ही नुकतेच प्रेमात पडला असाल अथवा तुमचे प्रेम अनेक वर्षांचे झाले असेल आपल्या प्रेमाच्या भावना व्यक्त करण्यासाठी आजही गुलाबाला अधिक महत्त्व दिले जाते. आपल्या प्रिय व्यक्तीला तुम्ही कोणते गुलाब देताय यालाही काही अर्थ आहे. जेव्हा तुम्ही प्रेम आपल्या जोडीदाराकडे व्यक्त करणार आहात, तेव्हा त्यांना कोणत्या रंगाचे गुलाब द्यावे आणि आपल्या भावना शब्दाविना कशा व्यक्त करत कसे नाते जपावे याबाबत काही टिप्स. प्रत्येक गुलाबाचा एक वेगळा अर्थ असतो आणि तो नातं जपताना प्रत्येकाला माहीत असायला हवा. गेल्या काही वर्षांत व्हॅलेंटाईन विक साजरा करण्याकडे अनेकांचा कल दिसून येतो. अशावेळी कोणत्या रंगाचे गुलाब कोणते प्रेम दर्शवते हे नात्यात जाणून घेणे नक्कीच मजेशीर ठरते.**

- लाल गुलाब : लाल रंग हा प्रेमाचे प्रतीक मानले जाते. लग्न झालेल्या महिलांसाठीदेखील लाल रंग हा त्यांच्या नवऱ्याच्या दीर्घायुष्याची निशाणी असल्याचे मानले जाते. त्यामुळेच रोझ डेच्या दिवशी जेव्हा तुम्ही आपल्या लाल गुलाब आपल्या आवडत्या व्यक्तीला देता तेव्हा तुम्ही त्यांच्यावर प्रेम करता आणि अत्यंत मनापासून प्रेम करता हेच दर्शवते. तुम्हाला काय बोलायचे कळत नसेल तर लाल गुलाब देत आपल्या मनातील प्रेमाच्या भावना सहज व्यक्त करू शकता.
- गुलाबी गुलाब : पिंक अर्थात गुलाबी गुलाब दिसायला जितके सुंदर असते तितकाच त्याचा रंगही खास मानला जातो. आपल्या आयुष्यात ज्या व्यक्तीला आणि ज्या नात्याला तुम्ही महत्त्वपूर्ण मानता त्यांना तुम्ही गुलाबी गुलाब द्यावे. मनातील भावना खऱ्या असून त्या कायम जपायचे आहे हे सांगताना तुम्ही तुमच्या प्रियकर वा प्रेयसीला देऊ शकता. तसंच आपल्या मित्रमैत्रिणींनादेखील तुम्ही हे देऊ शकता ज्यांचे तुमच्या आयुष्यात अटळ स्थान आहे.
- पिवळे गुलाब : पिवळ्या रंगाचे गुलाब हे मैत्रीचे प्रतीक मानले जाते. तुम्हाला प्रेमाचे पहिले पाऊल उचलायचे असेल आणि एखाद्याशी मैत्री करायची असेल तर त्यासाठी तुम्ही पिवळे गुलाब त्या व्यक्तीला देऊ शकता. तू माझ्याशी मैत्री करशील का? असा त्याचा शाब्दिक अर्थ होतो. तुम्ही हे गुलाब जर घेतले तर तुम्ही त्यांच्या मैत्रीचा स्वीकार करत आहात असा अर्थ होतो आणि मैत्रीच्या या नात्याला सुरूवात होते. कोणतेही नाते मैत्रीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.
- ऑरेंज गुलाब : नारिंगी रंगाचे गुलाब हे आकर्षणाचे प्रतीक आहे. तुम्ही एखाद्या व्यक्तीला जेव्हा पसंत करता आणि तुम्हाला त्या व्यक्तीला जाणून घेण्याची इच्छा असते, तुम्हाला त्यांच्याशी मैत्री करायची इच्छा असते तेव्हा ऑरेंज



गुलाब देण्यात येते. एखाद्याला तुम्ही त्यांना आवडत आहात हे सांगण्यासाठी ऑरेंज गुलाब द्या आणि नव्या नात्याची सुरुवात करा.
- सफेद गुलाब : सफेद गुलाब हे शांततेचे प्रतीक मानले जाते. सफेद गुलाब देऊन आपल्या नात्यातील राग, रूसवा आणि फुगवा असेल तर तो दूर करण्याचा प्रयत्न करत पुन्हा नात्याला जपण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो. पॅचअप करण्यासाठी तुम्ही या पांढऱ्या गुलाबाचा वापर करून नात्याला पुन्हा एकदा नवं नाव देण्याचा प्रयत्न करू शकता.

# व्हॅलेंटाईन्स डेला अनन्यसाधारण महत्त्व

**दरवर्षी १४ फेब्रुवारी हा व्हॅलेंटाईन्स डे म्हणून साजरा करण्यात येतो. गेल्या काही वर्षापासून तर ७ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी हा पूर्ण आठवडा व्हॅलेंटाईन विक म्हणून साजरा होतो. रोझ डेपासून सुरू होणारा हा आठवडा १४ फेब्रुवारीपर्यंत प्रेमाचा आठवडा वॅलेंटाईन्स डेच्या दिवशी संपतो. तसं तर प्रेमासाठी सगळेच दिवस महत्त्वाचे आहेत. पण तरीही जगभरामध्ये १४ फेब्रुवारीला गेल्या काही वर्षांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे...**

- व्हॅलेंटाईन डेचे महत्त्व : व्हॅलेंटाईन डे, ज्याला सेंट व्हॅलेंटाईन डे किंवा सेंट व्हॅलेंटाईनचा उत्सव असेदेखील म्हटले जाते. व्हॅलेंटाईन नावाच्या हुतात्म्याचा सन्मान करणारा हा दिवस मानला जातो. जगातील अनेक प्रदेशांमध्ये हा दिवस प्रणय आणि प्रेमाचा महत्त्वपूर्ण सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यावसायिक उत्सव बनला असल्याचे दिसून येत आहे.
- व्हॅलेंटाईनबाबत समज : रोझ डे ७ फेब्रुवारी रोजी साजरा होतो आणि याच दिवसपासून व्हॅलेंटाईन विकची सुरुवात केली जाते. प्रेमीयुगुलांसाठी हा आठवडा खास मानला जातो. यादिवशीपासून प्रेम व्यक्त करण्यासाठी अनेक जण उत्सुक असतात. १४ फेब्रुवारी रोजी मुलाचा वा मुलीचा होकार मिळाला तर प्रेम टिकून राहते असाही अनेकांमध्ये समज आहे. त्यामुळे या दिवसाची अनेक जण आतुरतेने वाट पाहात असतात.
- प्रेमाचा महिना : आपल्या आवडीच्या माणसासाठी काहीतरी वेगळं करण्याची ही एक संधीही असते. त्यामुळे रोज प्रेम साजरे करत असलात तरीही घाईगडबडीत आणि कामातून वेळ मिळत नसेल तर तुम्ही आपल्या प्रिय व्यक्तीसाठी अर्थात बॉयफ्रेंड - गर्लफ्रेंड अथवा नवरा - बायकोसाठी वेळ काढून काहीतरी खास करावे ही अपेक्षा असते जेणेकरून प्रेम कायम टिकून राहील.



### सुरुवात कशी झाली?

व्हेलेंटाईन डेची सुरुवात रोम देशातून झाली. Aurea of Jacobus de Verizon नावाच्या पुस्तकानुसार, रोममध्ये एक धर्मगुरू होते ज्यांचे नाव सेंट व्हॅलेंटाईन (संत व्हॅलेंटाईन) असे होते. जगात प्रेम वाढवण्यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्यासाठी प्रेम हेच जीवन होते. पण तिथला रोमन राजा क्लॉडियसला हे सर्व मान्य नव्हतं. तो याच्या विरोधात होता. रोमन राजा क्लॉडियसचा असा विश्वास होता की, प्रेम आणि विवाह पुरुषांच्या बुद्धिमत्तेवर आणि सामर्थ्यावर परिणाम करतात. याच कारणामुळे राजाच्या राज्यात राहणारे सैनिक आणि अधिकारी लग्न करू शकत नव्हते. पण, राजाच्या या विरोधाला न जुमानता, संत व्हॅलेंटाईन यांनी रोमच्या लोकांना प्रेम आणि विवाहासाठी प्रेरित केले. जेणेकरून प्रेमाला चालना मिळू शकेल. यातून प्रेरीत होऊन राजाच्या राज्यात राहणाऱ्या अनेक सैनिक आणि अधिकाऱ्यांनी लग्न केले आणि आपले आयुष्य पुढे नेले. यामुळे संतप्त होऊन राजा क्लॉडियसने १४ फेब्रुवारी इसवी सन पूर्व २६९ रोजी धर्मगुरू संत व्हॅलेंटाईन यांना फाशी दिली. त्या दिवसापासून दरवर्षी हा दिवस प्रेमाचा दिवस म्हणजेच व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो.

### व्हॅलेंटाईन नावामागील कहाणी काय?

आपल्या मृत्यूच्या वेळी संत व्हॅलेंटाईन यांनी जेलरची अंध मुलगी जेकोबस हिला डोळे दान करत एक पत्र लिहिले होते. या पत्रात त्यांनी युअर व्हॅलेंटाइन असं लिहिलं होतं. त्या अंध मुलीसाठी संत व्हॅलेंटाईन यांच्याकडून मिळालेली ही अनमोल भेट ठरली. त्यांच्या मृत्यूनंतर हा प्रेमाचा दिवस साजरा केला जाऊ लागला. यादिवशी फक्त कपल्सच एकमेकांना भेट वस्तू देऊ शकतात असं नाहीये. आपण आपल्या जवळच्या कोणत्याही प्रिय व्यक्तीला भेट वस्तू देऊन हा प्रेमाचा दिवस साजरा करू शकतो.

# प्रेम जपण्यासाठी पाठवा मेसेज

**जगभरात प्रेमाचा दिवस म्हणून साजरा करण्यात येणारा १४ फेब्रुवारी हा प्रत्येकाला हवाहवासा वाटतो. आपल्या आवडत्या व्यक्तीला, गर्लफ्रेंड, बॉयफ्रेंड, नवरा - बायको यांच्यासाठी हा प्रेमाचा दिवस खास असतो. आजच्या दिवशी आपल्या आवडत्या व्यक्तीसाठी काहीतरी खास करावे असं प्रत्येकालाच वाटत असते. यासाठी अनेक प्लॅन्स आखले जातात. अनेक जण तर व्हॅलेंटाईन डे खास करण्यासाठी खूपच आधीपासून तयारी करत असतात. या दिवसाची खास सुरुवात करायची असेल तर प्रेमाचे संदेश पाठवून तुम्ही नक्कीच आपल्या जवळच्या व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंद पाहू शकता. मग वाट कसली पाहताय? पाठवा व्हॅलेंटाईन डे चे शुभेच्छा संदेश आणि करा त्यांना खुश!**



- आजचा दिवस आहे खास, जन्मभर मिळो मला तुझा सहवास, आजचा दिवस आनंदाने भरलेला जावो आणि आयुष्यही तुझ्या सान्निध्यात. व्हॅलेंटाईन डे च्या शुभेच्छा!
- संपूर्ण वर्षभर वाट पाहत होतो या दिवसाची, कारण आजचाच तो दिवस आहे जेव्हा मला मागायचा आहे आयुष्यभरासाठी तुझी साथ, Happy Valentine Day!
- या विशेष दिवशी, तुला इतकंच सांगायचं आहे की जितकं प्रेम तू माझ्यावर करतेस त्याच्या कितीतरी पटीने मी करतो आणि आयुष्यभर करत राहीन. व्हॅलेंटाईन डे च्या शुभेच्छा!
- तुझ्या प्रेमाच्या बाहुपाशाशिवाय अधिक सुख कसलेच नाही, मला पाहिल्यावर तुझ्या हृदयाचे जे ठोके ऐकू येतात, त्याशिवाय आनंद कशातच नाही. जन्मभर मला हाच आनंद मिळवायचा आहे, My Love Happy Valentine!
- प्रेमाची जादू तुझ्या हृदयाचा प्रत्येक कोपरा फक्त आजच नाही तर दररोज भरू दे. आजन्म मला तुझे असेच प्रेम मिळू दे

### गर्लफ्रेंडसाठी शुभेच्छा

- माझ्या हृदयाच्या प्रत्येक ठोका माझे तुझ्यावरील प्रेम अधिक उत्कटतेने वाढवतो. तू माझं कायमचं प्रेम आहेस. व्हॅलेंटाईन डेच्या शुभेच्छा, माझी सर्वात सुंदर माऊ!
- तुझ्यावर प्रेम करणे हे रोलरकोस्टरवर स्वार होण्यासारखे आहे, अत्यंत रोमांचक, पुढे काय आहे हे कधीही न कळण्यासारखे. पण मला ते प्रचंड आवडतं आणि मला आयुष्य तुझ्याबरोबर असंच जगायचं आहे, माझी होशील का?

- माझ्या हृदयात वाजणारा स्वर तूच आहेस, आयुष्यभर मला हा एकच राग आळवायचा आहे. तुझ्यासोबत सूर जुळवत जगायचे आहे, व्हॅलेंटाईन डे च्या शुभेच्छा!
- तुझ्याबरोबर, प्रत्येक क्षणाला असे वाटते की आपण आपल्या प्रेमाने आकाश रंगवत आहोत, अत्यंत गडदपणे, तेजस्वी आणि सुंदरपणे हे प्रेम रेखाटत आहोत. तू माझी सर्वात आवडती आणि सुंदर कलाकृती आहेस, जिला आयुष्यभर जपायचे आहे. व्हॅलेंटाईन डे च्या शुभेच्छा.
- तुझ्या प्रेमात पडणे म्हणजे खोलवर समुद्रात जाण्यासारखे आहे हे मला माहीत आहे पण त्या खोल समुद्रात मला प्रेमाच्या लाटा झेलायच्या आहेत, तुझे होऊन राहायचे आहे!

### बॉयफ्रेंडला द्या खास संदेश

- रोज माझे हृदय चोरणाऱ्या माणसासाठी हा खास संदेश आहे. तुझे प्रेम हे माझ्या जगण्याचा ध्यास आहे. Happy Valentine's Day my sweetheart!
- तू फक्त माझा प्रियकर नाहीस; तू माझे सर्वस्व आहेस आणि माझ्या आयुष्यातील एकमेव प्रेम आहेस. सुंदर आठवणी बनवण्यासाठी मला तुझ्यासह आयुष्य कायम जगायचं आहे. व्हॅलेंटाईन डे च्या शुभेच्छा!
- तुझ्यासोबतचा प्रत्येक दिवस हा आतापर्यंतच्या सर्वात रोमांचक प्रेमकथेचा एक अध्याय ठरलाय. या व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी, मी तुझा मनापासून आदर करते आणि आयुष्यभर करत राहीन, साथ देईन हेच सांगायचं आहे!
- ज्याच्याजवळ माझ्या हृदयाची किल्ली आहे, ज्याचे प्रेम माझे मार्गदर्शक आहे, त्या माझ्या सर्वस्व असणाऱ्याला व्हॅलेंटाईन डे च्या मनःपूर्वक शुभेच्छा!
- तुझ्या प्रेमात पडणे ही मी आतापर्यंत केलेली सर्वात सोपी गोष्ट आणि मी केलेली सर्वोत्तम निवड आहे. माझ्या फॉरेव्हर व्हॅलेंटाईनला Happy Valentine Day!

## Change In Name


I have change my name From Old Name, SHEKH AHEMAD SHEKHMAHEMUD New Name, AHEMAD MAHEMUD SHAIKH As Per My Document Affidavit, No. 33 AB 511979 Address: At. Manjram Tq. Naigaon. Dist. Nanded Pin 431709, MAHARASHTRA, INDIA

## Change In Name

I have change my name From Old Name, SHEKHMAHEMUD New Name, MAHEMUD JILANI SHAIKH As Per My Document Affidavit, No. 33 AB 511980 Address: At. Manjram Tq. Naigaon. Dist. Nanded Pin 431709, MAHARASHTRA, INDIA

## Change In Name

My Old Name is HUMERA MOHAMMADI KHALID MOHIUDDIN which now I am changing as HUMERA MOHAMMADI KHALID MOHIUDDIN KHAN Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.ADD : TAHURA COLONY NANDED 431605

CONSULTING PHYSIOTHERAPIST
कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट
डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)
उपलब्ध सुविधा
• कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट) • ड्राय नीडलींग थेरपीस्ट
• ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन • टेपींग थेरपीस्ट
• न्यूरो रिहॅबिलिटेशन
नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231


## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३८/२०२५ रेणुकाबाई व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार :-१. रेणुकाबाई शंकर कुडके, वय - ४७ वर्षे, २.श्रीकांत शंकर कुडके वय ३६ ३.सचिन शंकर कुडके वय ३० वर्षे सर्व रा.साठेनगर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड

विरूध्द

निरंक

विषय : वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत शंकर नभाजी कुडके यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र.२व ३ ही मुले आहेत. मयत शंकर नभाजी कुडके यांचा मृत्यु दि.२१/२/२००९ रोजी वृद्धपकाळाने झाला आहे. अर्जदार व मयत हे बिलोली ता. बिनोली येथे वास्तव्यास होते. मयताच्या पश्चात मयताचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत शंकर नभाजी कुडके यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १५/०३/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.३ फेब्रुवारी, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

आदेशावरून

क.लिपीक सहा.अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३५/२०२५ दिपा व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार :-१. दिपा सायलू कोरवार, वय - ४९ वर्षे, रा.सहयाद्रीनगर तरोडा बु.नांदेड २.मंजुषा पेंटाजी ईडपवार वय ४८ वर्षे रा.बालाजी नगर नांदेड ३.संध्या पेंटाजी ईडपवार वय ४४ वर्षे रा.पोचम्मा गल्ली कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

विरूध्द निरंक

विषय : वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत पेंटाजी नारायण ईडपवार यांचे अर्जदार क्र. १ ते ३ हे मुली आहेत. मयत पेंटाजी नारायण ईडपवार यांचा मृत्यु दि.२५/६/२०२३ रोजी झाला आहे. व अर्जदार यांच्या आई लक्ष्मी पेंटाजी ईडपवार यांचा मृत्यू दिनांक ३०/८/२०१३ रोजी झाला.अर्जदार व मयत हे मौजे कुंडलवाडी ता. बिनोली येथे वास्तव्यास होते. मयताच्या पश्चात मयताचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत पेंटाजी नारायण ईडपवार यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १३/०३/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.३० जानेवारी, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

आदेशावरून

क.लिपीक सहा.अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४०/२०२५ पु. ता.- १५/३/२०२५

अर्जदार-१.शेषाबाई सायलु कल्यापुरकर, वय ४९ वर्षे, व्यवसाय-शेती, २.गंगाधर सायलु कल्यापुरकर वय २९ वर्षे व्यवसाय मजुरी ३.बालु सायलु कल्यापुरकर वय १९ वर्षे व्यवसाय मजुरी सर्व रा.वंजार गल्ली कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

विरुध्द-

गैरअर्जदार-निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ३ यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ व ३ हे मयत सायन्ना मल्लन्ना कल्यापुरकर यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक १ ही मयत सायन्ना मल्लन्ना कल्यापुरकर यांची पत्नी आहे.व अर्जदार २ व ३ हे मयत सायन्ना मल्लन्ना कल्यापुरकर यांचे मुले आहेत.मयत सायन्ना मल्लन्ना कल्यापुरकर यांचा मृत्यू दिनांक १५/४/२०१९ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्र.१ ते ३ यांना मयत सायन्ना मल्लन्ना कल्यापुरकर यांचे वारसा असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदारांनी मा. न्यायालयात मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील सर्व अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर मयताचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दिनांक ३/२/२०२५ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क.लिपीक सहा.अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर बिलोली


ऑफर ऑफर A/C ऑफर

महाराष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन

फेशियल
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-

डी-टॅन
१) O3+ 349/-
२) रागा 299/

ब्लीच
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-

कलर
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-

हेयर स्पा
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-

हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221



कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## Change In Name

Date 07/02/2025

I Ameena shaikh Baba (old name) R/o 1-15-219 Vishnu Nagar, DR. Mahajan Clinic GoKul Nagar, Shivaji Nagar, Nanded Have changed as my new name Amena shaikh Babumiya W/o Shaikh Babumiya.Shaikh Babumiya S/O Husensab

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर
ई -निवीदा सुचना क्रमांक 24 सन 2024-2025

कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर जिल्हा नांदेड (दुरध्वनी क्रमांक 02463-255111) हे महाराष्ट्र शासनच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या प्रवर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-1 निवीदा प्रणालीव्दारे मागवित आहेत सदर निविदामध्ये (25) कामे समाविष्ट असुन या निवीदे अतंर्गत सुंपर्ण माहिती www.maphapwd.gov.in http://www.paytopwd.com या संकेतस्थळावर आवश्यक निविदा शुल्क भुरुन माहिती व खेरदी (Downlod) करण्याचा कालवधी दिनांक 11.02.2025 ते 25.02.2025पर्यत आहे.

मोहरबंद निविदा स्विकृतीचा दिनांक 27.02.2025 रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर येथे **14.00** वाजे पर्यत.

उपरोक्त एकत्रीत कामांची निवीदा किंमत रुपये 1.00 कोटी पेक्ष कमी आहेत.

टिप :- निवीदा कोणतेही कारण न दर्शविता कोणत्या ही स्तरावर रद्द करणे अथवा स्विकारण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांनी राखुन ठेवला आहे.

139
विमाका/लातूर/जाहि.क्र....../२०२४-२०२५

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर
जि.नांदेड

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४८८

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.१९ मामक्र/ १६४

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शेख हसन शेख मोहीदीन रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट १६४ वार्ड नंबर १९ शेख मोहीदीन शेख मिया च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २०२५ दिनांक २३/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रस्ता, पश्चिम: मालमत्ता नंबर १६५, दक्षिण :मालमत्ता नबर १७५ , उत्तर :रस्ता,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७२

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.१९ मामक्र/२३४/१

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, हनीफ । बी अन्वर मिया रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट २३४/१ वार्ड नंबर १९ श्री.शेख मझहर शेख अन्वर च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २०२५ दिनांक -/-/- च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रस्ता, पश्चिम:प्लॉट नबर २३४/१ , दक्षिण :खयुम मिस्त्री , उत्तर :रोड,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७१

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.१९ मामक्र/ ३६६/२

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,साबीया बेगम शेख शादुला रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ३६६/२ वार्ड नंबर १९ शेख जियाउल्ल शेख शादुला च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २०२५ दिनांक २२/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -शेख उबेद, पश्चिम: मोकळी जागा, दक्षिण :मोकळी जागा , उत्तर :कॉलनी रस्ता,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७३

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.१९ मामक्र/१९८

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शेख सादीक शेख शाबीर २. शेख माजिद शेख शाबीर रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट १९८ वार्ड नंबर १९ श्री.शेख मुजीब शेख जाफर च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २०२५ दिनांक २३/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -शेख अकबर, पश्चिम:रोड, दक्षिण :रोड , उत्तर :शेख आयुब,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७०

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.८ मामक्र/ १७२/१

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शेख सोहेल शेख समद रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट १७२/१ वार्ड नंबर ८ श्री नयमुनबी अब्दुल समद च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २०२५ दिनांक २१/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे. किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -सल्लाम, पश्चिम: मुन्नाभाई,दक्षिण : अब्दुल खादर , उत्तर :समिर भाई,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४६९

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.१९ मामक्र/ ४६२

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सय्यद शाबीर सय्यद फारूक रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ४६२/२ वार्ड नंबर १९ श्री.जमीर अब्दुल सय्यद फारूक च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २०२५ दिनांक २१/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -३३ के. व्ही,पश्चिम: मिर्झा माजिद, दक्षिण :शेख मिरासाब , उत्तर :कॉलनी रस्ता,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७४

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.५ मामक्र/ १६४/१

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,१.दिंगाबर लक्ष्मण पांढरे २.दत्ता लक्ष्मण पांढरे रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट १६४/१ वार्ड नंबर ५ श्री.लक्ष्मण रानबा पांढरे च्या नावाने असलेले जायजाद यांनी संमती पत्रक नंबर २०२५ दिनांक २२/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रस्ता, पश्चिम: राजीव पांढरे, दक्षिण : दत्ता पांढरे , उत्तर :राजीव पांढरे,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७५

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.१४ मामक्र/ १०८

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शेख पाशा शेख हैदर रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट १०८ वार्ड नंबर १४ श्री शेख वसीम शेख पाशा यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा दिनांक -/-/- च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -सत्तार, पश्चिम: अब्दुल बारी, दक्षिण : रस्ता, उत्तर :रस्ता,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

नाव परिवर्तन करणे बाबत

जा.क्र./नपभो/नानो६/५६४

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,साहेबराव पिराजी मेटकर यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ४२ जुना वार्ड नं.- ३ मधील प्लॉट नंबर -मालमत्ता नं.२२२७ नविन वार्ड नं.२ नविन मालमत्ता नं.२०६४/८ साईज पुर्व पश्चिम ३९ फुट, दक्षिण उत्तर २६ फुट, चुर्तसिमा पुर्वे -रस्ता, पश्चिम: प्लॉट नंबर २१२, दक्षिण : मालकी जागा, उत्तर :गट नंबर ४६ व मालकी जागा, संतुकराव मारोती चालेवाड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपरिषद भोकर

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

नाव परिवर्तन करणे बाबत

जा.क्र./नपभो/नानो६/५६०

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सहेर अंजुम मसियोद्दीन काजी यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ६०२ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर - २८ मालमत्ता नं.ए-११० नविन वार्ड नं.१ नविन मालमत्ता नं.७३ साईज पुर्व पश्चिम ३० फुट, दक्षिण उत्तर ४०फुट., चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर २७, पश्चिम: प्लॉट नंबर २९, दक्षिण : १५ फुट रस्ता, उत्तर :जकिरोद्दीन खाजा अली, रुबिना बेगम शेख वकील यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपरिषद भोकर

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

नाव परिवर्तन करणे बाबत

जा.क्र./नपभो/नानो६/- ५६२

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शोभा कैलास टारफे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.१३९ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर ३८ मालमत्ता नं.बी-३३७/३८ नविन वार्ड नं.१५ नविन मालमत्ता नं.४४३/३८ साईज पुर्व पश्चिम १२.१९ मी , दक्षिण उत्तर ९.१४मी, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ३६, पश्चिम: २० फुट रस्ता, दक्षिण : प्लॉट नंबर ३७,उत्तर :प्लॉट नंबर ४५, दिपक दत्तात्रय गंधेवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपरिषद भोकर

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

नाव परिवर्तन करणे बाबत

जा.क्र./नपभो/नानो६/-५६३

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शिवराम वजीर आडे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ४८३ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर - २ मालमत्ता नं.५९२ नविन वार्ड नं.१० नविन मालमत्ता नं.२०९६ साईज पुर्व पश्चिम १२.१९ मी, दक्षिण उत्तर ९.१४ मीटर, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ३, पश्चिम: रस्ता, दक्षिण : प्लॉट नंबर १९ , उत्तर :रस्ता, भाऊराव वजीर आडे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपरिषद भोकर

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन

नाव परिवर्तन करणे बाबत

जा.क्र./नपभो/नानो६/-५६१

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,जिजाबाई चंदर जाधव यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ४१२ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर - - मालमत्ता नं.४८३ नविन वार्ड नं.१० नविन मालमत्ता नं.१९८७ साईज पुर्व पश्चिम १२.३३ मी, दक्षिण उत्तर १२.१९ मीटर, चुर्तसिमा पुर्वे -कदम यांचे घर, पश्चिम: मलुकाबाई राठोड, दक्षिण : रेखाजी जाधव , उत्तर :६.९ मीटर रस्ता, दिपमाला नागोराव पचलिंग यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगरपरिषद भोकर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७६

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.१९ मामक्र/ ४२४

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,अमेर खान युसुफ खान २. फेरोज खानयुसुफ खान रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ४२४ वार्ड नंबर १९ श्रीमती जाहेदाबी युसुफ खान च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २०२५ दिनांक २९/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे. किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रोड, पश्चिम: महेबुब खान, दक्षिण : नाला , उत्तर :सादिक,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४७७

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.२ मामक्र/ २४

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,गयाबाई दत्तात्रय गाजेवार रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट २७ वार्ड नंबर २ श्री.संतोष दत्तात्रय गाजेवार च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर संमत्री पत्र २०२५ दिनांक २४/१/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रस्ता, पश्चिम: शाम टेकळे, दक्षिण : रस्ता , उत्तर :भूयार,

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर

## जाहीर पत्रक

नगर पंचायत हिमायतनगर

जा.क्र./४८७

नाव परिवर्तन करणे बाबत

वार्ड क्र.४१९ मामक्र/ ४१९

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,गंगाधर पुंजाराम बनसोडे रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ४१९ वार्ड नंबर ९ श्री.अब्दुल मुजीब अब्दुल माझीद यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर २०३/२०१७ दिनांक २०/३/२०१७ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रस्ता, पश्चिम: रस्ता, दक्षिण :अजमिरे बी , उत्तर :रस्ता

मुख्याधिकारी
नगरपंचायत हिमायतनगर




# गोदातीर समाचार






## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले गुरुद्वारात सचखंड श्री हजूर साहिबचे दर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दि. ६ रोजी शीख धर्माचे १० वे गुरु श्री गुरु गोबिंद सिंघजी महाराज यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जगप्रसिद्ध गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजूर साहिबचे गुरुवारी दर्शन घेतले. गुरुद्वारा साहिबचे ग्रंथी (पुजारी) सिंघ कडून सिरेपाओ, शाल व फुलहार देऊन सत्कार करण्यात आला.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुद्वारा साहिबचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ यांच्या कार्यालयास भेट दिली. गुरुद्वारा बोर्डाचे अधिक्षक गुरबचन सिंघ यांनी सिरेपाओ, शाल, श्री गुरु गोबिंद सिंघ जी महाराजांची फोटो व पुष्पगुच्छ देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गुरुद्वारा बोर्डाच्या वतीने त्यांना निवेदन देण्यात आले. राज्य सरकार कडून गुरुद्वारा साहिबसाठी एक सोलर प्लांट तयार करून देण्याबाबत मागणी करण्यात आली. तसेच राष्ट्रपतींना नांदेड दौऱ्यावेळी त्यांना IIMS हॉस्पिटल बाबत दिलेल्या निवेदनाच्या पुढील कार्यवाहीसाठी निवेदन देण्यात आले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या निवेदनाबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आणि आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आमदार हेमंत पाटील, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंद पाटील बोंढारकर, आ. बाबुराव कदम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा उपायुक्त अजीतपाल सिंघ संधू, गुरुद्वारा बोर्डाचे सहायक अधिक्षक शरणसिंघ सोढ़ी, हरजीतसिंघ कडेवाले, रविंदरसिंघ कपूर, जैमलसिंघ ढिल्लों, बलविंदरसिंघ फौजी, प्रदीपसिंघ लांगरी व गुरुद्वारा बोर्डाचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## साहित्यातून समाज बदलतो -न्या.सुरेखा कोसमकर

### कै. बापुसाहेब मेगदे गुरुजी स्मृती व्याख्यानमाला संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** आम्ही न्यायाधीश शब्दांचा वापर करुन आरोपीला दोषी किंवा निर्दोष ठरवतो, एवढाच काय तो आमचा साहित्याशी संबंध. पण साहित्यिकांच्या साहित्य निर्मितीमुळे समाजात अनेक अमुलाग्र बदल घडून येत असतात, ते फार मोठे व मोलाचे कार्य असते, असे प्रतिपादन नांदेडच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती सुरेखा कोसमकर केले.



कै. गणपतराव उर्फ बापुसाहेब मेगदे गुरुजी यांच्या १२ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आशीष गोधमगांवकर हे होते.

यावर्षी आयोजित व्याख्यानमालेत यावेळी मुंबईचे तीन ख्यातनाम कवी सर्वश्री अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे आणि चंद्रशेखर सानेकर यांनी 'अशी बोलते कविता' या विषयावर बोलतांना एक आगळा वेगळा प्रयोग करत आपल्या कविता, गझल सादर करत मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आणि भरगच्च कुसुम सभागृहातील रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करुन टाकले.

या कार्यक्रमात अविरत आरोग्य सेवा व सामाजिक जागरण कार्याला आपले जीवन समर्पित करणारे ज्येष्ठ वैद्यक डॉ. बी. सी. साजणे यांचा आणि अविरत कृषीक्षेत्र सेवा व सामाजिक जागरण कार्याला आपले जीवन समर्पित करणारे प्रगतीशील शेतकरी प्रसाद देव यांना यमुना प्रतिष्ठान तर्फे प्रत्येकी शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ आणि रोख अकरा हजार रुपयांची राशी देऊन गौरविण्यात आले.

गौरवमुर्ती ज्येष्ठ वैद्यक डॉ. साजणे म्हणाले की, आपल्या माता-पित्याच्या स्मृतीप्रित्यर्थ असा उपक्रम सलग एक तप चालवून एक चांगला पायंडा पाडला आहे, असे विचार प्रगट करत मेगदे कुटुंबीयांचे कौतूक केले. यमुना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. उमेश मेगदे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

प्रतिष्ठानचे सचिव रमेश मेगदे यांनी प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन केले. तर ॲड. गजानन पिंपरखेडे यांनी सुत्रसंचालन केले. पशुवैद्यक डॉ. सुरेश मेगदे यांच्या पसायदान गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रगतीशील शेतकरी प्रसाद देव यांनी आभार व्यक्त केले.

## शिवाजीनगर ठाण्याच्या हद्दीत एकाचा खून; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील खोब्रागडेनगर येथील रुपेश धुताडे याचा गल्लीत दादागिरी का करतोस म्हणून लाथा बुक्क्यांनी जबर मारहाण करून खून करण्यात आला. ही घटना २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास पाटीदार भवन पटेल कॉलनी येथे घडली.

खोब्रागडेनगर येथील रुपेश दिगंबर धुताडे (वय २०) हा मित्रासोबत गेला असता तेथे उभा असलेला लक्ष्मण गायकवाड (वय ४०) याने माझ्या मुलास कशाला घेऊन आलास म्हणून व गल्लीत दादागिरी का करतोस या कारणावरून त्याला थापड बुक्क्यांनी मारहाण करून खाली पाडले आणि परत उजव्या पायाने रुपेश धुताडे याच्या डोक्यात लाथाबुक्यांनी मारहाण करून त्याचा खून केला. दिगंबर गणपतराव धुताडे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी लक्ष्मण गायकवाड विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक माने करत आहेत.

## नांदेडचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्वीकारला पदभार

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे गुरुवारी सकाळी रुजू झाले. पूर्व जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत स्वागत झाले. यावेळी मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यापूर्वी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. २०१५ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असणारे राहुल कर्डिले यांनी यापूर्वी अमरावती सहाय्यक जिल्हाधिकारी, परभणी सहाय्यक जिल्हाधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा जिल्हाधिकारी आणि सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आदी पदे त्यांनी भूषविली आहेत.

मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची छत्रपती संभाजी नगर येथे वस्तू व सेवा कर सहआयुक्त पदावर बदली झाली आहे. अभिजीत राऊत गेल्या अडीच वर्षापासून नांदेड येथे जिल्हाधिकारी पदावर कार्यरत होते.

## किनवट-माहूर महामार्गावरील दुभाजकावर टेम्पो आदळला

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट - माहूर राष्ट्रीय महामार्गावर शांतीभूमी स्मशानाजवळ तसेच आयप्पा मंदिराजवळ उभारण्यात आलेल्या चुकीच्या दुभाजकांमुळे अपघातांचे सत्र सुरूच आहे. बुधवारी दि. ५ रात्री याच दुभाजकावर एक आयचर टेम्पो आदळला. सुदैवाने या दुर्घटनेत जीवित हानी टळली.

बुधवारी रात्री छत्रपती संभाजीनगर येथून बिस्कीटे घेवून किनवटला आलेला आयचर टेम्पो (एमएच - २० ई जी.९५४३) रात्री साडे नऊच्यादरम्यान परतीच्या प्रवासाला निघाली. शांतीभूमीजवळील पुलावर अंधारामुळे चालकास दुभाजक न दिसल्याने सदर टेम्पो दुभाजकावर धडकला. या अपघातात चालक व क्लिनरला किरकोळ मार बसला. तर टेम्पोचेही नुकसान झाले. सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने एखाद्या मोठ्या अपघाताची वाट न पाहाता अतिरिक्त व चुकीच्या पद्धतीने उभारलेले दुभाजक काढून टाकावेत, तसेच डॉ. आंबेडकर चौक ते नेम्मानीवार यांच्या पेट्रोल पंपापर्यंतच्या रस्त्यावरील जागोजागी दिलेले बायपास कमी करावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

तसेच हिमायतनगर ते किनवट रस्त्याचे काम ७ वर्षांपासून रखडलेले असताना एन.के.गार्डन ते बाळासाहेब ठाकरे चौक, गोकुंद्यापर्यंतचा रस्ता धोकादायक बनला आहे. या रस्त्याचे काम रखडवून वाहनधारकांना वेठीस धरण्याचा प्रकार संतापजनक आहे. या रस्त्यावरील नाली व धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

## सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांची चौकशी करण्याचे प्रादेशिक उपसंचालकांचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक शिवानंद मिनगिरे यांच्या भ्रष्ट कामाची चौकशी करण्यासाठी प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग लातूर यांच्या आदेशाने त्रिसदस्ययी समिति गठित करण्यात आली आहे.

नांदेड येथील सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक शिवानंद मिनगीरे यांनी नांदेड जिल्ह्यातील धनगर समाजाच्या इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांचे संस्थाचालक यांच्याशी संगणमत करून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते दीपक कसबे व पंकज कांबळे यांनी अनेकदा वरिष्ठांकडे केली होती. याच मागणीसाठी दि. ४ फेब्रुवारी रोजी लातूर येथील उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात केली होती.

या उपोषणाची दखल घेत प्रादेशिक उपसंचालक यांनी शिवानंद मिनगिरे यांची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे. ज्यामध्ये लेखाधिकारी मनोज सकट, सहाय्यक लेखाधिकारी श्रीप्रसाद बोरसे आणि कार्यालय अधीक्षक एस. बी. नटवे यांचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यात असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळातून शासन ध्येय धोरण व शासनाच्या नियमाप्रमाणे शिक्षण उपलब्ध होत नसून सहाय्यक संचालक ईमाबक नांदेड शिवानंद मिनगिरे हे संस्थाचालक यांच्याशी संगनमत करून कोट्यावधींचा निधी हडप करीत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते दीपक कसबे व पंकज कांबळे यांनी केली होती.

## 'स्वारातीम' विद्यापीठात ख्यातनाम लेखक अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र संकुल आणि सामाजिक शास्त्र संकुलातर्फे दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक, साहित्यिक अच्युत गोडबोले यांचे 'ए आय तंत्रज्ञान:आज आणि उद्या' या विषयावरील विशेष व्याख्यान होणार आहे.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार आहेत. हे व्याख्यान अधिसभा सभागृहात होणार आहे. या व्याख्यानास प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, वाचन प्रेमींनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र संकुल आणि सामाजिक शास्त्र संकुलाच्यावतीने करण्यात आले आहे.

## आ. राजेश पवार यांचा रविवारी उमरीत नागरी सत्कार

**उमरी (प्रतिनिधी)–** नागरी सत्कार समितीच्या वतीने नवनिर्वाचित आमदार राजेश पवार व भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा सौ. पुनम पवार यांचा रविवारी दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता नागरी सत्कार करण्यात येणार आहे



ग्रामीण भागातील सरपंच, चेअरमन, उमरी शहरातील व्यापारी राष्ट्रवादी काँगेस पक्ष शिवसेना भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या वतीने मोंढा मैदानावर हा सत्कार सोहळा होणार आहे. तत्पूर्वी सायंकाळी पाच वाजता महादेव मंदिर येथून आमदार राजेश पवार व सौ. पूनम पवार यांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

ही मिरवणूक बस स्थानक, नगर पालिका कार्यालय, मुख्य बाजार पेठेतून मोंढा मैदानातील कार्यक्रमस्थळी पोहचणार आहे. त्यानंतर मिरवणूक विसर्जित केली जाणार आहे. या कार्यक्रमास शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नागरी सत्कार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.







## गिरजीनाथ सरोदे यांचे निधन, आज अंत्यविधी

**कंधार (प्रतिनिधी)** – येथून जवळच असलेल्या नवरंगपूरा येथील शिवाजी कॉलेज समोर असलेल्या गोविंद टी हाऊसचे मालक गिरजीनाथ आसाराम सरोदे यांचे गुरुवार दि. ६ फेब्रुवारी, रोजी दुपारी एक वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ८० वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ७ रोजी सकाळी ९ वाजता नवरंगपूरा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. गिरजीनाथ सरोदे यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, एक मुलगा, सून, नातू असा परिवार आहे.



**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com